रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | रविवार । दि. १२ जुलै २०२६ । अंक ३६ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## २८ वर्षीय तरुणाची हत्या; गुन्हा दाखल

**पनवेल** : स्कायलाइन सोसायटी, सेक्टर ३, करंजाडे येथे राहणाऱ्या शुभम पवार या २८ वर्षीय तरुणाची हत्या केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. शुभम मारुती पवार हा इलेक्ट्रिशन म्हणून नोकरी करत असून, तो कामावरून घरी आला. आणि त्यानंतर मित्राचा फोन आल्याने तो कामासाठी घरातून बाहेर गेला. त्यानंतर त्याचा फोन बंद येत होता. त्यामुळे नातेवाईकांकडून पनवेल शहर पोलीस ठाण्यात तो हरवल्याची तक्रार करण्यात आली. त्याचा शोध घेत असताना आठ जुलै रोजी वरचे ओवळेमधील रिक्षा •> पान २ वर

## भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर

**माणगाव** : माणगाव-दिघी मार्गावरील निळगुण गावाच्या हद्दीत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मालवाहू ट्रकला भरधाव अ‍ॅक्टिवा दुचाकीने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका २० वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शनिवारी (दि. ११) दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहतसिम धनसे (२०, रा. मोर्बा) आणि सूफियान बंदरकर (१९, रा. मोर्बा) हे अ‍ॅक्टिवा (एमएच ०६ सीबी ८५२८) वरून मोर्बा येथून माणगावकडे येत होते. •> पान २ वर

### वेधक

## विमल गुटख्यावर एलसीबीची धडक

**पनवेल** : रायगड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने प्रतिबंधित गुटखा विक्रेत्यांविरोधात मोठी कारवाई करत पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून ८८,९६८ किमतीचा केशरयुक्त विमल पान मसाला गुटखा जप्त केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एलसीबीचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या पथकाने भोकरपाडा येथील किराणा दुकानावर धाड टाकली. छाप्यामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला केशरयुक्त विमल पान मसाला गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे आढळून •> पान २ वर

## तीनपत्ती जुगार अड्ड्यावर छापा

**आपटा** : खालापूर तालुक्यातील वावर्ले गावातील एका घरात सुरू असलेल्या तीनपत्ती जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य असा एकूण २९ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पितांबर नरसु मोरे (५०, रा. वावर्ले, ता. खालापूर) याच्यासह इतर चार जणांविरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आपल्या राहत्या घरात तीनपत्ती जुगार सुरू ठेवल्याचा आरोप आहे. ही कारवाई ८ जुलै रोजी खालापूर •> पान २ वर

# ‘शिवतीर्थ’ उभारणीला दिवाळीचा मुहूर्त?

### सीआरझेडची परवानगी अखेर मिळाली | ७७ कोटींच्या प्रशासकीय वास्तूचा मार्ग मोकळा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेचा सर्व प्रशासकीय कारभार एकाच छताखाली आणण्याचे स्वप्न साकार करणारे रायगडचे भाग्यविधाते माजी जिल्हा परिषद अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांच्या दूरदृष्टीला आता नव्याने आकार मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सीआरझेड विभागाकडून अखेर बहुप्रतीक्षित परवानगी मिळाल्याने अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला असून, पावसाळ्यानंतर दिवाळीच्या सुमारास या बहुमजली इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ होण्याची शक्यता आहे.




### स्व. प्रभाकर पाटील यांची दूरदृष्टी साकार होणार

रायगड जिल्हा परिषदेचा संपूर्ण प्रशासकीय कारभार एकाच छताखाली आणण्याची संकल्पना तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांनी मांडली होती. त्यांच्या पुढाकारातून १९८२ मध्ये अलिबाग येथे शिवतीर्थ ही प्रशासकीय इमारत उभी राहिली. चार दशकांहून अधिक काळ जिल्ह्याच्या प्रशासनाचा केंद्रबिंदू ठरलेली ही वास्तू धोकादायक झाल्याने पाडावी लागली. आता सीआरझेडची परवानगी मिळाल्याने त्याच ठिकाणी आधुनिक, तळमजला अधिक सहा मजली नवी प्रशासकीय इमारत उभारली जाणार असून, स्व. प्रभाकर पाटील यांची दूरदृष्टी पुन्हा नव्या रूपात साकार होणार आहे.

> ग्रामविकास विभागकडून निधी मंजूर झाला असून, सीआरझेडची परवानगी प्राप्त झाली आहे. पावसाळ्यानंतर नियोजनानुसार प्रतयक्ष बांधकामाला प्रारंभ करण्याचे नियोजन आहे. एकाच छताखाली सर्व विभाग पुन्हा कार्यरत झाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासन अधिक कार्यक्षम होईल.
> – नेहा भोसले, सीईओ, राजिप

रायगड जिल्हा परिषदेची शिवतीर्थ ही प्रशासकीय इमारत १९७८ मध्ये उभारण्यास सुरुवात झाली होती आणि १९८२ मध्ये तिचे काम पूर्ण झाले. तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांच्या संकल्पनेतून उभी राहिलेली ही वास्तू ग्रामीण भागातील नागरिकांना सर्व विभागांची कामे एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावीत या उद्देशाने बांधण्यात आली होती. त्यापूर्वी जिल्हा परिषदेची बहुतांश कार्यालये पेण येथे कार्यरत होती. त्यानंतर सर्व कार्यालये अलिबाग येथे स्थलांतरित करण्यात आली आणि शिवतीर्थ रायगडच्या प्रशासकीय ओळखीचे केंद्र बनली.

मात्र, चार दशकांहून अधिक काळ सेवा दिलेल्या या इमारतीचे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील स्थापत्य अभियंत्यांकडून करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर प्रशासनाने इमारत तातडीने रिकामी करण्याचा निर्णय घेतला. गेल्या चार वर्षांपासून जिल्हा परिषदेची सर्व कार्यालये कुंटेबाग आणि इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यात आली असून, सध्या तेथूनच जिल्हा परिषदेचा कारभार सुरू आहे.

काही महिन्यांपूर्वी जुन्या इमारतीचे पाडकाम पूर्ण करण्यात आले. मात्र, समुद्रकिनारी असलेल्या जागेचा सीआरझेड क्षेत्रात समावेश असल्याने नव्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक परवानगी मिळण्यास विलंब होत होता. अखेर सीआरझेड विभागाने हिरवा कंदील दिल्याने अनेक महिन्यांपासून रखडलेला प्रकल्प पुन्हा मार्गी लागला आहे.


नव्या इमारतीचे बांधकाम तळमजला अधिक सहा मजले असे होणार असून, या प्रकल्पासाठी ग्रामविकास विभागाकडून सुमारे ७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पावसाळा संपल्यानंतर दिवाळीच्या सुमारास प्रत्यक्ष बांधकामाला प्रारंभ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रायगडच्या प्रशासकीय इतिहासात महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे पुन्हा एकदा सर्व विभाग एकाच छताखाली कार्यरत होणार असून, नागरिकांना विविध कामांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी हेलपाटे मारण्याची गरज उरणार नाही. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या प्रकल्पाला अखेर गती मिळाल्याने जिल्हाभरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, नव्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व विभागप्रमुख आणि विविध शाखांची कार्यालये पुन्हा एकाच प्रशासकीय संकुलात कार्यरत होणार आहेत. यामुळे जिल्हाभरातून कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.

# संशयित तरुणांची चौकशीनंतर मुक्तता

### शहजाद भट्टीच्या सोशल मीडिया संपर्कावरून एटीएस सतर्क




**एटीएसकडून सूचना**

- सोशल मीडियावरील अनोळखी किंवा संशयास्पद व्यक्तींशी संपर्क टाळा.
- पालकांनी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर आणि इंटरनेटवरील हालचालींवर लक्ष ठेवावे.
- जलद पैसा, नोकरी किंवा आर्थिक आमिष दाखविणाऱ्या ऑफर्सना बळी पडू नका.
- संशयास्पद संदेश, देशविरोधी मजकूर किंवा भडकावू पोस्ट फॉरवर्ड करू नका.
- कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने पोलिस किंवा एटीएसशी संपर्क साधावा.

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातून दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) ताब्यात घेतलेल्या तीन संशयित तरुणांची सखोल चौकशी केल्यानंतर त्यांची मुक्तता करण्यात आली आहे. चौकशीत कोणताही दहशतवादी कट अथवा गंभीर गुन्हेगारी संबंध आढळून आला नसला, तरी पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंधित सोशल मीडिया खात्यांशी संपर्क आढळल्याने सुरक्षा यंत्रणांनी या तिघांवर करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

एटीएसच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत तालुक्यातील एका फार्महाऊसमधून उत्तराखंडमधील दोन तरुणांना, तर खोपोली येथून जळगाव जिल्ह्यातील एका तरुणाला ताब्यात घेण्यात आले होते. पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंधित सोशल मीडिया अकाऊंटशी त्यांचा संपर्क आढळून आल्याने त्यांची चौकशी करण्यात आली.

तिन्ही तरुणांची एटीएसने सखोल चौकशी करून त्यांचा शहजाद भट्टीच्या सोशल मीडिया खात्याशी संपर्क कसा आला, याचा तपशील जाणून घेतला. प्राथमिक चौकशीत कोणतीही गंभीर किंवा दहशतवादी कारवायांशी संबंधित बाब समोर आली नसल्याने त्यांना सोडून देण्यात आले आहे. मात्र, संबंधित सोशल •> पान २ वर

## भारतीय पर्यटकांचा व्हिएतनाममध्ये मृत्यू

**नवी दिल्ली** : व्हिएतनाममधील प्रसिद्ध फू क्वोक बेटाजवळ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी स्पीडबोट समुद्रात उलटल्याने १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला, तर २१ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली. बोटीत एकूण ३६ प्रवासी होते. स्थानिक प्रशासनाच्या माहितीनुसार, समुद्रातील तीव्र लाटांमुळे हा अपघात झाला. दुर्घटनेनंतर नौदल, कोस्ट गार्ड आणि बचाव पथकांनी तातडीने शोध व बचाव मोहीम राबवून सर्व प्रवाशांना किनाऱ्यावर आणले. मृतांमध्ये १३ पुरुष आणि २ महिलांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेनंतर भारतीय दूतावासाने मदत आणि माहितीसाठी हेल्पलाईन सुरू केली असून, मृतांची ओळख पटविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### आम्ही तुम्हाला सर्वांसमोर उघडे पाडू

## महाराष्ट्रावर ‘सर्वोच्च’ संताप

- **फौजदारी खटल्यांतील विलंबाबाबत न्यायालयाची तीव्र नाराजी**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फौजदारी खटल्यांतील विलंब आणि जामीन अर्जांबाबतच्या राज्य सरकारच्या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला शनिवारी तीव्र शब्दांत फटकारले. “तुम्ही जामीन अर्जांना जोरदार विरोध करता, पण खटल्यांना गती देण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलत नाही. अशीच परिस्थिती राहिली तर आम्ही तुम्हाला सर्वांसमोर उघडे पाडू,” असा कठोर इशारा न्यायालयाने दिला.

न्यायमूर्ती हसनुद्दीन अमानुल्ला आणि शील नागू यांच्या खंडपीठासमोर एका परदेशी नागरिकाच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू असताना ही तीव्र टिप्पणी करण्यात आली. अपहरण आणि खून प्रकरणातील आरोपी तब्बल चार वर्षांपासून तुरुंगात असून, या काळात त्याच्या खटल्याची ८६ वेळा सुनावणी झाली. मात्र, त्याला ५३ वेळा न्यायालयातच हजर करण्यात आले नसल्याची बाब समोर आली.



यावर न्यायालयाने तीव्र •> पान २ वर

## मारहाण प्रकरण; तिघांना कारवास


**माणगाव** : सरकारी कर्तव्य बजावत असताना पोलीस पाटलाला मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी रोहा येथील न्यायालयाने तीन आरोपींना प्रत्येकी दोन वर्षांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याशिवाय प्रत्येक आरोपीस तीन हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी पांडुरंग दिवकर हे रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटील असून, त्यांनी आरोपी विनोद कासकर याच्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पोलीस ठाण्यात हजर राहण्याची सूचना देण्यासाठी दिवकर हे •> पान २ वर

# पाताळगंगा प्रदूषित करण्याचा उद्योग

### ।। एमपीसीबीची तीन उद्योगांना बजावली नोटीस

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा नदीत रासायनिक सांडपाणी सोडून जलप्रदूषण होत असल्याच्या प्रकरणात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) अधिकृत कारवाई सुरू केली असून, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तीन उद्योगांना प्रस्तावित आदेश नोटीस बजावण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या सातत्यपूर्ण जनहिताच्या पाठपुराव्यानंतर मंडळाने ही कारवाई सुरू असल्याचे १० जुलै रोजी दिलेल्या लेखी पत्राद्वारे स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी मुख्यमंत्री, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची अधिकृत दखल घेत मंडळाने पाताळगंगा नदी परिसरातील औद्योगिक आस्थापनांची नियमित तपासणी सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच पर्यावरणीय अटी व शर्तींचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई सुरू असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या अनुषंगाने एम/एस द बॉम्बे डाईंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, एम/एस गतिक सिंथेसिस एलएलपी आणि एम/एस रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (लॅब डिव्हिजन) या तीन उद्योगांना प्रस्तावित आदेश (इशारा) नोटीस बजावण्यात आल्याची माहिती मंडळाने दिली आहे.

यापूर्वी •> पान २ वर

## इर्मॅजिका येथे पर्यटकाचा मृत्यू

**खोपोली** : खालापूर तालुक्यातील इर्मॅजिका याठिकाणी फिरण्यासाठी आलेल्या एका पर्यटकाचा हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १० जुलैच्या दुपारी चार ते पाचच्या दरम्यान घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूर कुळगाव येथील रहिवासी कपिल शांताराम पाटील, वय वर्ष ४७, हे दिनांक १० जुलै रोजी आपल्या कार्यालयातील सहकाऱ्यांसोबत इर्मॅजिकामध्ये सहलीसाठी आले होते. दरम्यान, त्यांना अचानक चक्कर येऊन ते खाली कोसळले. उपस्थितांनी तातडीने मदतीचा प्रयत्न केला; मात्र त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले. घटनेची माहिती •> पान २ वर

## स्मार्ट कार्डसाठी बहिणींची फरफट



- **सर्व्हर डाऊनमुळे नागरिकांचे हाल**
- **पनवेल एसटी डेपोतील बुकिंग कार्यालयात गर्दी**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल एसटी डेपोच्या बुकिंग कार्यालयात स्मार्ट कार्ड काढण्यासाठी शनिवारी सकाळपासून महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनी मोठी गर्दी केली. सकाळी आठ वाजल्यापासूनच रांगा लागल्या होत्या. घरातील कामे बाजूला ठेवून आलेल्या अनेक महिलांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. मात्र, दिवसभर हेलपाटे मारूनही अनेकांची नोंदणी पूर्ण होऊ शकली नाही.

स्मार्ट कार्ड नोंदणीचे काम एका खाजगी कंपनीमार्फत करण्यात येत आहे. मात्र, दिवसभर वारंवार सर्व्हर बंद पडत असल्याने संपूर्ण प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू होती. परिणामी, •> पान २ वर

## तीन अपघात, चार ठार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल परिसरात गेल्या २४ तासात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यामध्ये पनवेलकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या लेनवर मोटरसायकलला ट्रेलरने दिलेल्या धडकेत बहीण-भावाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मोटारसायकल क्रमांक एमएच ४६ डीएच २७९३ वरून प्राशु भारद्वाज सिंग (१८) आणि वंशिका भारद्वाज सिंग (२० दोघेही रा. इंडियाबुल्स पनवेल)हे जात होते. यावेळी पनवेलकडून जेएनपीटी कडे जाणाऱ्या लेनवर ट्रेलर क्रमांक जीजे ३६ वी २६०९ वरील चालक राजीव कुमार विजयशंकर याने ट्रेलर भरधाव •> पान २ वर

## अनोळखी पुरुषाचा आढळला मृतदेह

**श्रीवर्धन**: श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथील एमटीडीसी समुद्रकिनाऱ्यावर एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनंतर श्रीवर्धन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन ग्रामस्थ व जीवरक्षकांच्या मदतीने मृतदेह समुद्रातून बाहेर काढत पंचनामा केला. गेल्या आठवड्यात महाड परिसरात झालेल्या मुसळधार पाऊस आणि पुराच्या पार्श्वभूमीवर हा मृतदेह सावित्री नदीमार्गे बाणकोट खाडीतून समुद्रात वाहत हरिहरेश्वर किनाऱ्यावर आला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी श्रीवर्धन पोलीस ठाणे (दूरध्वनी : ०२१४७-२२२२२८) येथे संपर्क साधावा.

### आधुनिक शेतीसाठी कृषीमित्र योजनेची घोषणा | ६५ व्या वार्षिक सभेत १२.५ टक्के लाभांश जाहीर

# आरडीसीसीचे दहा हजार कोटी व्यवसायाचे लक्ष्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आर्थिक प्रगतीचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत ८,१७५ कोटी रुपयांच्या व्यवसायाची नोंद केली असून, आता १० हजार कोटी रुपयांचा व्यवसाय आणि १,००० कोटी रुपयांचा स्वनिधी गाठण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे. बँकेच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही घोषणा करत अध्यक्ष जयंत पाटील यांनी सभासदांसाठी १२.५ टक्के लाभांश जाहीर केला.




● (छायाचित्र : समीर मालोदे)



अलिबाग येथील बँकेच्या केंद्र कार्यालयात झालेल्या सभेला संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, अधिकारी, कर्मचारी, सभासद तसेच जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात जयंत पाटील यांनी बँकेने केवळ आर्थिक प्रगतीच साधली नसून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठीही विविध उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले. आधुनिक आणि उत्पन्नक्षम शेतीला चालना देण्यासाठी कृषीमित्र योजना सुरू करण्यात आली असून, पडीक जमिनीवर बांबू लागवड तसेच ड्रॅगन फ्रूट प्रकल्पांसाठी केवळ ७ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. रोहा येथील प्रगतशील शेतकरी हर्षद साळवी यांनी ड्रॅगन फ्रूट शेतीत केलेल्या यशस्वी प्रयोगाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी त्यांनी आणखी एक महत्त्वाची बाब अधोरेखित करत सांगितले की, •> पान २ वर (संबंधित छायाचित्र पान ३ वर)

> रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि आर्थिक शिस्त यांच्या बळावर सातत्याने प्रगतीची नवी शिखरे गाठली आहेत. ८,१७५ कोटींच्या व्यवसायानंतर आता १० हजार कोटी व्यवसाय आणि १,००० कोटी स्वनिधीचे लक्ष्य गाठण्याचा आमचा निर्धार आहे. शेतकरी, सभासद आणि सहकार क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्यातील आदर्श सहकारी बँक म्हणून अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
> – जयंत पाटील, अध्यक्ष



# पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले

## • ७ डिसेंबरपासून नागपुरात हिवाळी अधिवेशन

## • विधानसभेत १८ तास १० मिनिटांचे रेकॉर्डब्रेक कामकाज

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले , आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ पासून नागपूर येथे होणार आहे. सोमवार, २२ जून ते शुक्रवार, १० जुलै २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या १४ दिवसांच्या सत्रात अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. मात्र हे अधिवेशनदेखील २०२४ पासून विरोधी पक्ष नेत्याविना पार पडले.

या अधिवेशनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, ९ जुलै रोजी विधानसभेचे कामकाज सलग १८ तास १० मिनिटे चालून १० जुलैच्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाले. त्यामुळे संसदीय कामकाजाचा एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी दोन्ही सभागृहांच्या प्रत्यक्ष कामकाजाची सांख्यिकीय माहिती पटलावर ठेवली.

विधानसभेत १४ दिवसांत एकूण १२७ तास ५४ मिनिटे प्रत्यक्ष कामकाज झाले. त्याची रोजची सरासरी ९ तास ८ मिनिटे इतकी होती. या सत्रात मंत्री उपस्थित नसल्यामुळे २५ मिनिटांचा, तर इतर कारणांमुळे ५ मिनिटांचा वेळ वाया गेला. विधानसभेत एकूण २२ शासकीय विधेयके पुरःस्थापित करण्यात आली, त्यापैकी २१ विधेयके संमत करण्यात आली, तर १ विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले. अशासकीय १२ विधेयके चर्चेअंती मागे घेण्यात आली. तारांकित प्रश्नांच्या ९ हजार ९५ सूचनांपैकी ४१० प्रश्न स्वीकृत झाले आणि ५८ प्रश्नांना प्रत्यक्ष उत्तरे मिळाली. लक्षवेधीच्या २ हजार ९९८ सूचनांपैकी २९२ स्वीकृत होऊन ६२ सूचनांवर सभागृहात चर्चा झाली. नियम २९३ अन्वये प्राप्त सर्व ५ प्रस्तावांवर चर्चा पार पडली. विधानसभेत आमदारांची जास्तीत जास्त उपस्थिती ८४.९६ टक्के, तर सरासरी उपस्थिती ७५.२६ टक्के इतकी नोंदवली गेली.

### विधान परिषदेत किती कामकाज झाले?

दुसरीकडे, विधान परिषदेतही १४ दिवसांमध्ये १०१ तास १० मिनिटे प्रत्यक्ष कामकाज झाले आणि रोजची सरासरी ७ तास १३ मिनिटे राहिली. मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे ३५ मिनिटे, तर इतर कारणांमुळे ४० मिनिटे वाया गेली. विधान परिषदेत पुरःस्थापित करण्यात आलेली सर्व ९ शासकीय विधेयके संमत करण्यात आली. तसेच विधानसभेतून मंजूर होऊन आलेली १८ विधेयकेही येथे पारित करण्यात आली आणि १ विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले. या सभागृहात प्राप्त २ हजार २९ तारांकित प्रश्नांपैकी ५४१ स्वीकृत झाले आणि ५८ प्रश्न उत्तरित झाले. ९३० लक्षवेधी सूचनांपैकी २४५ मान्य होऊन ४८ वर विस्तृत चर्चा झाली. नियम २६० अन्वये आलेल्या ५ प्रस्तावांवर सखोल चर्चा करण्यात आली. विधान परिषदेत सदस्यांची कमाल उपस्थिती ९०.१४ टक्के, तर एकूण सरासरी उपस्थिती ७८.५७ टक्के इतकी लक्षणीय होती.

# तहसील कार्यालय की दलालांचा अड्डा?

**• महिलांचाही समावेश असल्याची जोरदार चर्चा**

**• जनतेची खुलेआम आर्थिक लूट**

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तहसील कार्यालय हे नागरिकांच्या सेवेसाठी आहे की दलालांच्या कमाईचे केंद्र बनले आहे, असा संतप्त सवाल आता उरणकर उपस्थित करू लागले आहेत. तहसील कार्यालय परिसरात दलालांचा सुळसुळाट झाला असून, महसूल विभागाच्या विविध कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना गाठून तुमचे काम लगेच करून देतो अशी बतावणी करत हजारो रुपयांची लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या दलालांमध्ये काही महिलांचाही समावेश असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

सातबारा उतारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, जमिनीची कागदपत्रे आणि इतर महसुली कामांसाठी तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना कार्यालयात प्रवेश करण्यापूर्वीच दलाल घेरत असल्याचे चित्र आहे. कोणतीही ओळख नसताना नागरिकांची कागदपत्रे हातात घेऊन आमच्याकडे द्या, तुमचे काम लगेच करून देतो असे सांगून मोठ्या प्रमाणात पैसे उकळले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

विशेष म्हणजे, ही दलाल मंडळी सकाळपासून संध्याकाळपर्यंत तहसील कार्यालय परिसरात बिनधास्तपणे वावरत असतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर त्यांची उपस्थिती असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून हा प्रकार सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांना हे दिसत नाही का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांसोबतच प्रामाणिकपणे काम करणाऱ्या वकील वर्गालाही फटका बसत असल्याची माहिती समोर आली आहे. कायदेशीर मार्गाने काम करण्याऐवजी नागरिकांना दलालांच्या जाळ्यात अडकवून आर्थिक पिळवणूक केली जात असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महसूल विभागाची प्रतिमा मलिन करणाऱ्या या प्रकारावर तातडीने लगाम घालण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. तहसील कार्यालय परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून नियमित घुटमळणाऱ्या दलालांची ओळख पटवावी, त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कारवाईची मागणी होत आहे.

# राजनाला कालव्याची युद्धपातळीवर दुरुस्ती

**• जलसंपदा विभागाची तातडीची कारवाई**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील राजनाला परिसरात अतिवृष्टीमुळे कालव्यालगतचा मातीचा भराव वाहून जाऊन शेतजमिनींचे नुकसान झाल्यानंतर जलसंपदा विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत. कालव्याची पाहणी करून जेसीबीच्या सहाय्याने वाहून गेलेली माती हटविणे, भराव पूर्ववत करणे आणि कालव्याची दुरुस्ती करण्याची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे तांबस-सापेले परिसरातील कालव्यांना तडे गेले असून, अनेक ठिकाणी कालव्यांमधील माती शेतामध्ये वाहून गेली. त्यामुळे पाण्याचा वेग थेट शेतजमिनीत घुसल्याने उभी पिके, सुपीक माती आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही ठिकाणी नाल्यांचे काठही खचल्याने रस्ते आणि वाहतुकीलाही धोका निर्माण झाला होता.

घटनेची माहिती मिळताच जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने परिसराची पाहणी करून नुकसानग्रस्त ठिकाणी दुरुस्तीची कामे सुरू केली. कालव्यांचा भराव मजबूत करण्याबरोबरच भविष्यात अतिवृष्टी झाल्यास अशा प्रकारचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही करण्यात येत आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडून परवानगी मिळताच तत्काळ पंचनामे पूर्ण करून पुढील कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन जलसंपदा विभागाने दिले आहे.

# मंडळ अधिकारी कार्यालयाला कुलूप?




**• ग्रामस्थ अर्ज घेऊन येतात; पण स्वीकारणार कोण?**

**• अंग्रेनगरमधील घरांत पाणी शिरूनही पाहणी नाही**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रेवदंडा बायपास रस्त्यालगत असलेल्या मंडळ अधिकारी कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून मंडळ अधिकारी उपस्थित नसल्याने विविध कामांसाठी येणाऱ्या ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असल्याची तक्रार समोर आली आहे.

रेवदंडा परिसरात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे अंग्रेनगर भागातील काही ग्रामस्थांच्या घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले होते. या घटनेमुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून, संबंधित परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मंडळ अधिकारी घटनास्थळी आले नसल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

आपल्या अडचणी मांडण्यासाठी तसेच मदतीसंदर्भात संपर्क साधण्यासाठी ग्रामस्थांनी मंडळ अधिकाऱ्यांना दूरध्वनी करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांचा मोबाईल फोन बंद असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, विविध दाखले, महसूलविषयक कामे तसेच अर्ज सादर करण्यासाठी ग्रामस्थ आजही मंडळ अधिकारी कार्यालयात येत आहेत. मात्र कार्यालयात अर्ज स्वीकारण्यासाठीही कोणी उपलब्ध नसल्याने नागरिकांना अर्ज घेऊन माघारी परतावे लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुसळधार पावसामुळे नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरलेले असताना संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करणे अपेक्षित होते. मात्र, अधिकारी कार्यालयातही उपलब्ध नाहीत आणि दूरध्वनीवरही संपर्क होत नसल्याने नागरिकांनी आपल्या समस्या नेमक्या कोणाकडे मांडायच्या, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महसूल प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन मंडळ अधिकारी कार्यालयात नियमित अधिकारी अथवा पर्यायी कर्मचाऱ्याची व्यवस्था करावी, ग्रामस्थांचे अर्ज स्वीकारावेत आणि अंग्रेनगर परिसरातील पावसामुळे झालेल्या नुकसानीची तातडीने पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. कार्यालयात अधिकारी नाहीत... अर्ज स्वीकारायला कर्मचारी नाही... फोनही बंद; मग ग्रामस्थांनी न्याय मागायचा तरी कुणाकडे.

दरम्यान, याबाबत आता नवीन माहिती समोर आली असून, संबंधित मंडळ अधिकारी आजारी असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, एका ज्येष्ठ नागरिकाने आपल्या कामासाठी गेल्या तीन दिवसांपासून रेवदंडा येथील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारल्या.

कार्यालयात अधिकारी उपस्थित नसल्याने त्यांनी मंडळ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, अधिकारी आजारी असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

यावेळी संबंधित ज्येष्ठ नागरिकाने, ‘‘आपण आजारी असल्यामुळे कार्यालयात येऊ शकत नसाल, तर किमान कार्यालयाबाहेर तसा सूचना फलक लावणे आवश्यक होते. त्यामुळे कामासाठी दूरवरून येणाऱ्या नागरिकांना कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागल्या नसत्या,’’ अशी नाराजी प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

## पान १ वरून

### संशयित तरुणांची चौकशीनंतर मुक्तता

मीडिया अकाऊंट पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंधित असल्याने ही बाब सुरक्षा यंत्रणांनी गांभीर्याने घेतली आहे. त्यामुळे तिघांना मुक्त करण्यात आले असले तरी त्यांच्या हालचालींवर एटीएस आणि इतर सुरक्षा यंत्रणांची करडी नजर कायम राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, या सोशल मीडिया संपर्काचे स्वरूप आणि त्यामागील कारणांचा तपास सुरक्षा यंत्रणांकडून अद्याप सुरू असून, आवश्यकतेनुसार पुढील चौकशीही केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**कोणालाही पाठीशी घालणार नाही**

महाराष्ट्र पोलीस आणि दहशतवाद विरोधी पथक राज्यातील शांतता, सुरक्षितता आणि एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी कटिबद्ध असून, देशविघातक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही,‘‘ असा इशाराही एटीएसने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे. पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना देशविघातक कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त करत महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

### भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर

निळगुण गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मालवाहू ट्रक (एमएच ४६ एफ ४४६८) ला त्यांच्या दुचाकीची पाठीमागून जोरदार धडक बसली.

अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, मोहतसिम धनसे याचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या सूफियान बंदरकर याला प्रथम माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती, तर घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

### महाराष्ट्रावर ‘सर्वोच्च’ संताप

नाराजी व्यक्त करत, ‘‘चार वर्षांत ३४ पैकी केवळ दोन साक्षीदारांचीच साक्ष नोंदवली गेली. ही परिस्थिती लाजिरवाणी आहे. जलद न्याय हा आरोपीचा मूलभूत अधिकार आहे,’’ असे स्पष्ट केले. खंडपीठाने पुढे म्हटले की, राज्य सरकार जामीन अर्जांना विरोध करत असेल, तर खटल्यांची सुनावणीही तितक्याच वेगाने पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांची आहे. मात्र, प्रत्यक्षात तसे होताना दिसत नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्या वकिलांनी प्रत्येक तारखेला आरोपींना न्यायालयात हजर करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती दिली. मात्र, न्यायालयाने समाधान व्यक्त न करता राज्याने फौजदारी खटल्यांच्या जलद सुनावणीसाठी ठोस धोरण तयार करण्याचे निर्देश दिले. दर आठवड्याला किमान चार साक्षीदारांचे जबाब नोंदवावेत, असे आदेश देत भविष्यात अशा प्रकारच्या विलंबाच्या प्रकरणांमध्ये आणखी कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला.

### तीन अपघात, चार ठार

वेगाने चालवून मोटारसायकलला डाव्या बाजूने धडक दिली. या अपघातात मोटारसायकलवरील दोघेही खाली पडले आणि ते गंभीर जखमी होऊन त्यांचा जागी मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तर दुसऱ्या घटनेत पनवेल जवळील खंडोबा ढाबा समोरील रोडवर पेणच्या दिशेने मयत इसम पवनकुमार सरोज (३६, रा.वडाळा) या इसमाला प्रवासी बस वरील चालकाने त्याच्या ताब्यातील बस हयगयीने व बेदरकारपणे चालवून त्याला धडक मारुन अपघात करून गाडीसह पसार झाल्याने त्यात पवनकुमार याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर, तिसऱ्या घटनेत कळंबोली येथील फुडलँड मॉलसमोरील सिग्नलजवळ एका भरधाव ट्रकने मोटारसायकलला धडक दिल्याने मोटारसायकलस्वार त्रिलोकसिंह गुमानसिंह डांगी (६५) हे गंभीर जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### स्मार्ट कार्डसाठी बहिणींची फरफट

रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांचा संयम सुटल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेकांनी प्रशासनाच्या नियोजनावर नाराजी व्यक्त केली.

दिवसभर पावसामुळे दमट वातावरण असल्याने बुकिंग कार्यालयात प्रचंड उकाडा जाणवत होता. कार्यालयात पुरेशी हवेशीर व्यवस्था नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांसह आलेल्या नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. बसण्यासाठी जागा नसल्याने अनेकांना दीर्घकाळ उभे राहावे लागले.

नागरिकांनी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत, सर्व्हरची समस्या तातडीने दूर करावी, बसण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि पंख्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी केली. स्मार्ट कार्डसारख्या महत्त्वाच्या सेवेसाठी नागरिकांना दिवसभर ताटकळत ठेवणे योग्य नसल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

स्मार्ट कार्ड नोंदणी प्रक्रियेत वारंवार उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि अपुऱ्या सुविधांमुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाया जात आहेत. त्यामुळे एसटी प्रशासनाने आणि संबंधित खासगी कंपनीने समन्वय साधून कार्यपद्धतीत तातडीने सुधारणा करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

### इर्मॅजिका येथे पर्यटकाचा मृत्यू

मिळताच संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

### आरडीसीसीचे दहा हजार कोटी व्यवसायाचे लक्ष्य

जिल्ह्यातील सर्व विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे संगणकीकरण पूर्ण करणारी रायगड बँक ही देशातील पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ठरली आहे. तसेच महाराष्ट्रात प्रथमच ऑनलाइन व बायोमेट्रिक पद्धतीने पीककर्ज वितरण प्रणाली सुरू करण्यात आली असून, ७/१२ ची ऑनलाइन पडताळणी करून पारदर्शक, जलद आणि विश्वासार्ह कर्जप्रक्रिया राबविण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ चा सविस्तर अहवाल सादर करत बँकेने नेट एनपीए शून्य टक्के राखत ९३.३७ कोटी रुपयांचा ढोबळ नफा मिळविल्याची माहिती दिली. गेल्या वर्षभरात बँकेच्या व्यवसायात तब्बल २७ टक्के वाढ झाल्याचे सांगत त्यांनी ग्राहक, सभासद आणि कर्मचारी यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या सभेत कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक गिरीश तुळपुळे, विद्यमान अध्यक्ष नंदकुमार चाळके आणि संचालक मंडळ तसेच आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजीत पाटील आणि संचालक मंडळ, अधिकारी यांनी १००० कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव या सभेत करण्यात आला. यामध्ये रायगड जिल्ह्यातील पहिला फ्लाईंग ऑफिसर कौस्तुभ मेहूल पाटील, आदर्श आणि प्रयोगशील शिक्षक राजेश रामचंद्र भोईर (पेण), आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेटपटू योगेश पेणकर (महाड), प्रगतशील शेतकरी मनोहर दत्तात्रेय पाटील, मंदार पाटील (अलिबाग), हर्षद साळवी (रोहा), शरीरसौष्ठवपटू प्रणव पुजारी (अलिबाग), कृषीभूषण प्रगतशील शेतकरी दिलीप भाऊ शिंदे (महाड), आरसीएफ एक्स एम्प्लॉयी सोशल फोरम आणि पर्यावरण संवर्धन संस्था ग्रीन अलिबाग यांचा समावेश होता. तसेच बँकेच्या ठेववाढीमध्ये उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल बँकेचे संचालक संतोष पाटील यांचादेखील विशेष सन्मान करण्यात आला.

अहवाल वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकेशी संलग्न पेझारी (अलिबाग), पाच्छापूर (पाली), कोप्रोली (पेण), वरंध (महाड), नेरळ (कर्जत) आणि गोसावीबुवा (तळा) या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचाही यावेळी गौरव करण्यात आला. तसेच ३६ वर्षे प्रामाणिक आणि उत्कृष्ट सेवा बजावणारे अधिकारी महेंद्र माळी आणि अहवाल सालात उत्कृष्ट कामगिरीबद्दल नवीन पनवेल शाखेच्या शाखाधिकारी निशा घरत यांचाही सभेत सन्मान करण्यात आला. सभेला सभासद, अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मारहाण प्रकरण; तिघांना कारवास

आरोपीच्या घरी गेले असता, आरोपींनी त्यांना हाताबुक्क्यांनी मारहाण केली तसेच शिवीगाळ करून सरकारी कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर रोहा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक आर. एस. रोडे यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान फिर्यादी पोलीस पाटील पांडुरंग दिवकर, पंच तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. सादर करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने विनोद कासकर, दिपेश न्हावकर आणि दिपक न्हावकर यांना दोषी ठरवत ८ जुलै रोजी प्रत्येकी दोन वर्षांच्या साध्या कारावासाची तसेच तीन हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. रूपेश अरविंद महाकाळ यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तसेच तपास अधिकारी आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही खटल्याच्या सुनावणीत महत्त्वाचे सहकार्य केले.

### तीनपत्ती जुगार अड्ड्यावर छापा

-कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमित गस्तीदरम्यान करण्यात आली. सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी वावर्ले येथील घरावर छापा टाकला. छाप्यात आरोपी जुगार खेळताना आढळून आले.

या कारवाईत २९ हजार २० रुपयांची रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले असून, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार सुधीर मोरे, रवी मुंडे, रणजितसिंह खराडे आणि शरद फरांदे यांच्या पथकाने केली. पुढील तपास खालापूर पोलीस करत आहेत.

### विमल गुटख्यावर एलसीबीची धडक

आले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत ८८,९६८ किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नितेश ज्ञानेश्वर पाटील (३०, रा. भोकरपाडा, ता. पनवेल) आणि दिनेश मकीजा (रा. बदलापूर) यांच्याविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार रवी मुंडे, शरद फरांदे, रणजितसिंह खराडे तसेच पोलीस शिपाई प्रदीप खरात यांनी सहभाग घेतला. कारवाईनंतर आरोपींची वैद्यकीय तपासणी करून त्यांना आणि जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी रसायनी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### २८ वर्षीय तरुणाची हत्या, गुन्हा दाखल

स्टॅन्डच्या समोर सेक्टर एक या ठिकाणी त्याची मोटारसायकल पडलेली दिसून आली. आणि त्याच्याजवळ असलेले इलेक्ट्रिशनचे काम करण्याचे सामानदेखील अस्ताव्यस्त पडलेले होते. दुपारी दोनच्या सुमारास वरचे ओवळे मधील महात्मा फुले कॉलेजच्या जवळील पाण्याच्या टाकीच्या मागे डबक्यात त्याचा मृतदेह सापडून आला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. यावेळी शवविच्छदन अहवालात शुभम याचा मृत्यू गळा दाबून झाल्याचे समजले. त्यानंतर अज्ञाता विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल शहर पोलिसांनी संशयीतांना ताब्यात घेतले आहे.

### पाताळगंगा प्रदूषित करण्याचा उद्योग

पत्रकार संघाने पाताळगंगा नदीत रात्रीच्या वेळी किंवा सुट्टीच्या दिवशी रासायनिक सांडपाणी सोडले जात असल्याची तक्रार मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी आणि संबंधित प्रशासनाकडे पुराव्यांसह केली होती. संबंधित उद्योगांची ओळख निश्चित करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, ईटीपी व सीईटीपी यंत्रणेची स्वतंत्र चौकशी करावी, नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सार्वजनिक करावा तसेच नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली होती.

याबाबत प्रतिक्रिया देताना रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे म्हणाले, ‘‘महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पत्र हे पाताळगंगा नदी प्रदूषणाबाबत पत्रकारांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची अधिकृत दखल आहे. मात्र, केवळ नोटीस बजावून जबाबदारी संपणार नाही. दोषी उद्योगांविरुद्ध पर्यावरणीय कायद्यांनुसार दंडात्मक, फौजदारी आणि प्रशासकीय कारवाई होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास राष्ट्रीय हरित लवाद, उच्च न्यायालय तसेच इतर सक्षम प्राधिकरणांकडे पुढील कायदेशीर लढा उभारला जाईल.’’

पाताळगंगा नदीतील वाढते प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नसून शेतकरी, मच्छिमार, आदिवासी बांधव आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्याशी निगडित गंभीर जनहिताचा विषय असल्याचे पत्रकार संघाने अधोरेखित केले आहे. त्यामुळे प्रदूषणासाठी जबाबदार उद्योगांची जबाबदारी निश्चित करून जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्याची मागणी राकेश खराडे यांनी केली आहे.

राकेश खराडे म्हणाले, ‘‘पाताळगंगा नदी प्रदूषण प्रकरणात कोणत्याही उद्योगाला कायद्यापेक्षा मोठे समजले जाणार नाही. पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरुद्ध अंतिम न्याय मिळेपर्यंत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने लढा सुरूच राहील.

# रोपवाटिका कुजल्या



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यात गेल्या आठवडाभरात झालेल्या अतिवृष्टीमुळे खारेपाट परिसरातील शेतीचे मोठे नुकसान झाले असून, सुमारे ११ हजार ८०० हेक्टर क्षेत्रातील भाताच्या रोपवाटिका कुजून गेल्या आहेत. सतत पाणी साचून राहिल्याने शेतकऱ्यांसमोर पुन्हा पेरणीचे मोठे संकट उभे ठाकले आहे. नव्याने पेरणी करण्यासाठी भाताचे बियाणे भिजवून मोड आणल्यानंतर रोह पद्धतीने पेरणी करावी लागणार असल्याने शेतकऱ्यांवर अतिरिक्त मेहनत आणि खर्चाचा बोजा पडणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात बियाणे उपलब्ध होणेही कठीण असल्याने शेतकरी नव्याने बियाण्यांच्या शोधात धावपळ करत आहेत. दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होऊनही महसूल विभागाचे अधिकारी अद्याप पंचनाम्यासाठी न पोहोचल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने बियाणे उपलब्ध करून देण्यात यावे आणि नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# उपसरपंचपदी रवी राठोड

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील वावेघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रवी राठोड यांची निवड झाल्याने ग्रामपंचायतीच्या विकासकामांना नवी गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेले सर्व निर्णय पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने घेतले जातील. मूलभूत सुविधांबाबत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व सदस्य एकत्रितपणे कार्य करतील, असा विश्वास ग्रामपंचायत सदस्यांनी व्यक्त केला.

# विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांचा सन्मान!






























● विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान यावेळी करण्यात आला. अहवाल वर्षात उत्कृष्ट कामगिरीबद्दल पेझारी (अलिबाग), पाच्छापूर (पाली), कोप्रोली (पेण), वरंध (महाड), नेरळ (कर्जत) आणि गोसावीबुवा (तळा) या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचा, तसेच रायगड जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या विशेष गौरव करण्यात आला. तसेच ३६ वर्षांची उल्लेखनीय सेवा बजावणारे अधिकारी महेंद्र माळी आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल नवीन पनवेल शाखेच्या शाखाधिकारी निशा घरत यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. (छायाचित्र : समीर मालोदे)

## निवडक



### वरंध गावात बोर्डो पेस्टचे प्रात्यक्षिक

**महाड :** शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी कृषि महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली कृषिदूतांनी वरंध या गावात ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना फळबागेमध्ये बोर्डो पेस्टचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यामध्ये बोर्डो पेस्टचे व्यवस्थापन कसे करावे, हे सांगितले. त्याचबरोबर शेतकऱ्यांना बोर्डोपेस्ट व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, बोर्डो पेस्ट कशी तयार करावी व त्याचे फायदे देखील सांगितले. कृषि महाविद्यालय मोहोप्रे-आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही.जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक व विषयतज्ज्ञ डॉ. एस.एस रायकर, कार्यक्रम अधिकारी प्रा.एन.व्ही.सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रात्यक्षिक दाखवले.



### वेदक महाविद्यालयात मार्गदर्शन कार्यशाळा

**तळा :** येथील जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स येथे प्रथम वर्ष बीएससी विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व विषय निवड मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली. यावेळी समन्वयक डॉ. एन.एम. शेख यांनी मेजर-मायनर विषय, क्रेडिट प्रणाली, मल्टिडिसिप्लिनरी अभ्यासक्रम व विषय निवडीची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. तर, विभागप्रमुखांनी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व प्राणिशास्त्र विषयातील उच्च शिक्षण, संशोधन व करिअरच्या विविध संधींची माहिती दिली. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून अंतर्गत उपलब्ध शैक्षणिक संधी, महाविद्यालयातील विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती व विद्यापीठ पोर्टलबाबत मार्गदर्शन केले. तसेच, विविध समिती प्रमुखांनी आपल्या विभागांची माहिती दिली. या कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम वर्ष बीएससीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### कुडावे शाळेत गणवेशाचे वाटप

**चिरनेर :** पत्रकार लक्ष्मीकांत ठाकूर आणि नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रमोद भोपी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्ताने कुडावे गावातील राजिप शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश, बेल्ट, ओळखपत्र व शालेय साहित्यांचे वाटप केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश गायकर, ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती, भोपी, सुभाष पाटील, माजी उपसरपंच तुकाराम ठोंबरे, सावळाराम ठोंबरे, साक्षात भोपी, संतोष भोपी, हितू शिसवे, सुरेंद्र पाटील, मुख्याध्यापिका रंजिता परदेशी यांच्यासह शाळा समितीचे अध्यक्ष, सदस्य, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका रंजीता परदेशी यांनी लक्ष्मीकांत ठाकूर व प्रमोद भोपी यांच्या परोपकारी वृत्तीचे कौतुक केले.

### राजेंद्र खाडे यांना वकील पदवी

**माणगाव :** माणगावातील भादाव गावचे आरोग्य सेवक तथा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे तालुकाध्यक्ष ॲड. राजेंद्र खाडे यांनी एलएलबी हि मानाची पदवी संपादन केली आहे. ॲड.राजेंद्र खाडे यांचे वकील होण्याचे स्वप्न होते. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी खाडे यांनी अथक परिश्रम, जिद्द, ध्येय आणि चिकाटी ठेवून माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयातून बीएससीनंतर एलएलबीचे शिक्षण घेऊन त्यांनी हि परीक्षा उत्तीर्ण होऊन वकील होण्याचा मान मिळविला. राजेंद्र खाडे हे एक उत्तम आरोग्य सेवक असून, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तालुका माणगावचे अध्यक्ष आहेत. ते बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा राखून गेली अनेकवर्ष माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात काम करीत आहेत. आरोग्य सेवक म्हणून त्यांनी कोरोना काळात उत्तम कामगिरी बजावून गावागावात जाऊन तेथील लोकांना कोरोनाबाबत योग्य ते मार्गदर्शन केले. अन्यायाविरुद्ध ठामपणे आवाज उठवणे, सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हीच शिकवण माझ्या गुरूंकडून मिळाली असून, ती मला भावी आयुष्यात प्रेरणादायी ठरणार आहे, असे ॲड. राजेंद्र खाडे यांनी बोलताना सांगितले.





### कार्यशाळांमध्ये गणेशमूर्तींची लगबग

**खांदा कॉलनी :** पनवेलमधील भिंगारी येथील श्री गणेश मूर्ती कार्यशाळांमध्ये सध्या मूर्ती घडविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यंदा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला साजेशी ''माऊली विठोबा'' संकल्पनेवरील श्री गणेशाची आकर्षक मूर्ती विशेष लक्ष वेधून घेत आहे. पंढरपूरच्या विठ्ठल दर्शनासाठी लाखो वारकरी जशी पायी वारी करतात, त्याच भावनेतून साकारण्यात आलेली ही मूर्ती गणेशभक्तांचे आकर्षण ठरत आहे. याशिवाय पारंपरिक, देखण्या आणि विविध संकल्पनांवरील श्री गणेशाच्या मूर्तीही मोठ्या प्रमाणावर तयार केल्या जात आहेत. गणेश कारागीर अहोरात्र मेहनत घेऊन प्रत्येक मूर्तीला कलात्मक रूप देत आहेत. यंदा श्री गणेशाच्या मूर्तींच्या किमतीत सुमारे ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे कारागिरांनी सांगितले. माती, रंग, सजावटीचे साहित्य, वाहतूक आणि मजुरी खर्च वाढल्याने दर वाढविणे अपरिहार्य ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# तुफान पावसाचा गोवेकरांना फटका

## ● भातशेतीचे नुकसान; शेतकरी हवालदिल ● पुराच्या पाण्यात रस्ता गेला वाहून

**| कोलाड | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात सतत तीन-चार दिवस पडलेल्या तुफान पावसामुळे अनेक ठिकाणी पुरस्थिती निर्माण झाली होती. त्यातच रोहा तालुक्यातील कोलाड येथील गोवे गावातील रस्ता या पुरात वाहून गेल्याची घटना घडली आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन गोवे गावात जाण्यासाठी वाहनांना जागाच राहिली नसल्याने प्रवास करणे धोक्याचे झाले आहे. याशिवाय या पुराच्या पाण्यात शेतकऱ्यांनी पेरून ठेवलेला राब देखील कुजून गेल्याने भात लावणी करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थ व शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

हवामानाच्या अंदाजानुसार यंदा पाऊस कमी पडेल, असे बोलले जात होते. त्यामुळे यंदा एक महिना उशीरा पावसाने सुरुवात केली. मात्र, असे असली तरी दि.५ ते ८ जुलै रोजी पडलेल्या तुफान पावसामुळे



एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. या पावसात रोहा तालुक्यातील कुंडलिका व महिसदरा दोन्ही नदीच्या बेचक्यात असणाऱ्या गोवे गावाची अवस्था अतिशय बिकट झाली होती. गोवे गावाला पुराच्या पाण्याने घेरले. त्यामुळे येथील भातशेती पुर्णपणे पाण्यात बुडाली. काही दिवसांपुर्वी टाकलेला राब देखील या पुराच्या पाण्यात कुजून गेला. त्यामुळे शेतकऱ्यांकडे लावणी करण्यासाठी राब राहिलेला नाही.

पूर्वी या परिसरात उन्हाळी व पावसाळी अशी दोन्ही पिके घेतली जात होती. परंतु, मूठवली बंधारा जीर्ण झाल्यामुळे येथे उन्हाळी भातशेती करणे अवघड झाले होते. त्यानंतर १ कोटी रुपये खर्च करून मूठवली बंधारा बांधण्यात आला. परंतु, त्याला सात-आठ वर्षे उलटून गेली तरी अद्याप उन्हाळी भातशेतीला पाणी मिळालेले नाही.

> ''२५ वर्षांपूर्वी गोवे गावातील शेतकरी उन्हाळी व पावसाळी अशी वर्षातून दोन्ही पिके घेत होता. त्यामुळे संपूर्ण वर्षाचा खर्च भागवून शेतकऱ्याच्या गाठीला पैसे शिल्लक रहात होते. परंतु, आता परिस्थिती उलट असुन गेल्या अनेक वर्षांपासून उन्हाळी पाटबंधारे विभागाच्या आडमुठपणाचे धोरण व पावसाळी निसर्गाचा कोप यामुळे या गावातील भातशेती संकटात सापडत आहे. त्यातच मजुरी, मशागतीची कामे, खताच्या किंमतीत दुप्पट वाढ झाली असली तरी शेतकरी भातशेतीची कामे करीत आहे. परंतु, त्याच्या पदरी निराशाच येत आहे. त्यामुळे यापुढे पाटबंधारे विभागाने महिसदरा नदीला गेलेल्या खांडी व इतर कामे करून पाणी पुरवठा सुरळीत सुरू करावा. त्यामुळे दोन्ही पिके पूर्ववत सुरु होतील.''
>
> – राजेश शिर्के, अध्यक्ष, शेतकरी व गावकमेटी, गोवे

### पाटबंधारे विभागाचा बेजबाबदार कारभार

गेल्या सात-आठ वर्षांपासून गोवे गावातील शेतकऱ्यांची दयनीय परिस्थिती झाली आहे. पाटबंधारे विभागाच्या बेजबाबदार कारभारामुळे येथील शेतकरी वर्गाला दुबार पिक घेणे अवघड झाले आहे. अनेक वेळा पाटबंधारे विभागाकडे नदीला गेलेल्या खांडी भरण्यासाठी व संरक्षण भिंती बांधण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे. त्यानंतर पाटबंधारे विभागाकडून थातूर मातुर काम केले जाते आणि पावसाळा सुरू झाली की परिस्थिती जैसे थे अशीच राहते. त्यासाठी लोकप्रतिनिधींनी देखील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नाहीतर येथील शेतकरी आणि भात पिक कायमचा नामशेष होऊन जाईल, असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

त्याल कोलाड पाटबंधारे विभाग जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. या ठिकाणी फक्त धरण बांधण्यात आले असून, पाणीपुरवठा करणारे कालवे, पोटकालवे व मोऱ्यांचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तसेच, अनेक वर्षांपासून या नदीला अनेक ठिकाणी गेलेल्या खांडीमुळे पावसाळी भातपीक घेणे देखील कठीण झाले आहे. दरम्यान, याबाब लोकप्रतिनिधींकडून देखील कोणताचा पाठपूरावा होत नसल्याचे शेतकऱ्यांमधून होत आहे. तसेच, गोवे गावात जाण्यासाठी सुसज्ज बनविण्यात आलेला रस्ता या पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. त्यामुळे गावात जाणाऱ्या रिक्षा, मिनिडोअर, चारचाकी व इतर वाहनांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थ व शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवे क्षितिज

**| माणगाव | प्रतिनिधी |**

एखादी शैक्षणिक संस्था केवळ इमारतींनी मोठी होत नसते; ती विद्यार्थ्यांच्या विश्वासाने, पालकांच्या अपेक्षांनी आणि समाजाच्या आशीर्वादाने मोठी होते. हा विश्वास रायगड जिल्ह्यातील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमती गीता तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग या संस्थेने अत्यंत कमी कालावधीत संपादन केला आहे. यंदा नर्सिंग प्रवेशासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाला सर्वाधिक पसंती दिल्याने संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण आहे. ''रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा'' मानणाऱ्या या महाविद्यालयाने पहिल्याच वर्षात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय आशेचा किरण ठरत असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा देणारे केंद्र बनले आहे. या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना खासदार सुनील तटकरे यांनी महाविद्यालयाच्या नव्या अत्याधुनिक इमारतीचे उद्घाटन लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती दिली. सुसज्ज प्रयोगशाळा, आधुनिक वर्गखोल्या, अद्ययावत प्रशिक्षण सुविधा आणि विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सोयींनी सजलेली ही इमारत रायगडच्या शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# साई डोंगर भागात दरड कोसळली

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात पाली तर्फे कोतवाल खलाटी या ग्रामपंचायत हद्दीत प्रस्तावित असलेल्या टोरंट जलविद्युत प्रकल्पासाठी माती आणि दगड परीक्षण सुरू आहे. मागील १० महिने या कामासाठी ड्रिलिंग करण्याची कामे सुरू असल्याने या भागात पहिल्यांदा भूस्खनन होण्याच्या घटना घडल्या. साई डोंगर परिसरात प्रथम अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या आणि झाडे कोसळून मोठे नुकसान झाले आहे.

पाली तर्फे कोतवाल खलाटी या ग्रामपंचायतीमध्ये टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा जलविद्युत प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी गेल्या वर्षापासून माती आणि दगड परीक्षण केले



जात आहे. त्यासाठी प्रस्तावित धरणाच्या परिसरात विविध ठिकाणी जमिनीमध्ये आणि खडकामध्ये ड्रॉलिंग केले जात आहे. त्या त्या ठिकाणी जमिनीच्या भूगर्भातून माती काढून, तर काही ठिकाणी खडकातून काढलेल्या दगडाचे परीक्षण काम सुरू आहे. त्याचा मोठा परिणाम यावर्षी पहिल्याच पावसात दिसून आला आहे. साई डोंगर भागात यापूर्वी कधीही भूस्खनन होण्याच्या घटना घडल्या नव्हत्या. या भागात डोंगरातील माती खाली पडण्याची घटना घडलेली नसल्याने माती परीक्षण करण्यासाठी केले जाणारे ड्रिलिंगमुळे धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती सतत व्यक्त केली जात होती. मात्र, त्यावेळी त्यांचे कोणी ऐकले नाही आणि मालकी जमिनीमध्ये ड्रिलिंग करण्याचे काम सुरू झाले. जमिनी विकत आणि भाडेतत्वावर देखील घेतलेल्या नसताना सुरू असलेले ड्रिलिंगमुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

# ज्योती राऊत यांचा मदतीचा हात

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठणेपासून डोलवी पर्यंतच्या सुमारे ४० गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या चिकणी येथील के.टी. बंधारा परिसरातील जेएसडब्ल्यू कंपनीची जलवाहिनी फुटल्याने गेल्या आठवड्यापासून पाणीपुरवठा ठप्प झाला होता. परिणामी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर नागोठण्यातील नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्या ज्योती राऊत व संदीप राऊत यांनी येथील कुंभार आळी,


(छायाचित्र : महेश पवार)

मराठा आळी, गवळआळी आणि रमाईनगर परिसरातीले पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. यावेळी केएमजी विभागातील प्रवीण आमडोसकर, सुनील धुमाळ, सुजित पाटील, शेखर जोगत, सूरज तळेकर, मयूर पाटील, निशांत पाटील, प्रशांत नाकते, यश आमडोसकर, सुशांत धुमाळ, ऋषिकेश भगत, गौरव वाघमारे, प्रमोद महाडिक, संचित भगत, रोहित कळमकर आदी कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# पाऊस थांबताच उकाडा वाढला

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

सकाळपासून अधूनमधून पडणाऱ्या पावसाने काही काळ विश्रांती घेताच पनवेल शहरात पुन्हा उकाड्याने डोके वर काढले आहे. वातावरणात अचानक वाढलेल्या उष्णता आणि दमटपणामुळे नागरिकांची चांगलीच कोंडी हो आहे. विशेषतः



महिला वर्गाने उन्हाचा व उकाड्याचा त्रास टाळण्यासाठी स्कार्फ, ओढणी व चेहरा झाकणारे कापड परिधान करून घराबाहेर पडण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे पनवेलमधील बाजारपेठ, मुख्य रस्ते व व्यावसायिक परिसरात अनेक महिला चेहरा पूर्णपणे झाकून व डोक्यावर स्कार्फ बांधून फिरताना दिसत आहेत. पावसाळा सुरू असला तरी मधूनच पडणाऱ्या उन्हामुळे त्वचेचे संरक्षण आणि उष्णतेपासून बचाव करण्यासाठी हा पर्याय महिलांकडून स्वीकारला जात असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. दरम्रून, हवामानातील सततच्या बदलामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, पुरेसे पाणी प्यावे आणि शक्यतो दुपारच्या तीव्र उकाड्यात बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

# गणना प्रपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गणना प्रपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, संबंधित अधिकारी व कर्मचारी नागरिकांकडून आवश्यक माहिती संकलित करत आहेत. या प्रक्रियेत नागरिकांनी अचूक व संपूर्ण माहिती देऊन आपले नाव मतदान यादीत पक्के करा, असे आवाहन मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले. मतदार यादीत आपले नाव पक्के करण्यासाठी दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड क्रमांक, मोबाईल नंबर, जन्मतारीख, आई-वडिलांचे पूर्ण नाव व जुन्या ओळखपत्राचा क्रमांक लागणार आहे. ही कागदपत्रे आपल्या मतदान केंद्र अधिकारी यांच्याकडे जमा करावी. तसेच, कोणतीही माहिती लपवू नये किंवा चुकीची देऊ नये. सर्वांनी निर्धारित कालावधीत गणना प्रपत्र भरून संबंधित कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. या करिता प्रत्येक शाळेत कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे, असे आवाहन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले.

# 'शिष्यवृत्ती परीक्षा बौद्धिक क्षमतेची कसोटी'

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, अभ्यासातील सातत्याची आणि आत्मविश्वासाची खरी कसोटी असते, असे प्रतिपादन मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी केले. मुरूड ग्रामीण विभागातून नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थीनी अन्वी बिरावडकर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगीरी केली आहे. त्यासाठी तिच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

त्यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत बोलत होत्या.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते अन्वी बिरावडकर हिला सन्मानित करण्यात आले. पुढे बोलताना मुख्याध्यापिका अर्चना खोत म्हणाल्या की, आजचा दिवस आपल्या शाळेसाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. आपल्या शाळेतील अन्वी बिरावडकर हिने शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती परीक्षेत मुरूड ग्रामीण विभागातून तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिच्यासह तिच्या पालकांचे मनः पूर्वक अभिनंदन. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची आणि अभ्यासातील सातत्याची कसोटी असते. अशा परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## एकदिवसीय वर्षा सहलीचा ट्रेंड | पर्यटक सुरक्षित पर्यटनस्थळांच्या शोधात

# माथेरान पावसाळी पर्यटनाने बहरले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी वर्षा सहलीसाठी पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. त्यात माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांची ''एकदिवसीय पर्यटन'' ही नवीन ट्रेंड दिसून येत आहे. त्यामुळे वर्षा सहलींच्या निमित्ताने माथेरानमधील पर्यटन उन्हाळ्यापेक्षा पावसाळ्यात अधिक बहरलेले दिसून येत आहे.

मागील काही वर्षांपासून वर्षा सहल हा प्रकार तरुणाईमध्ये जोर धरू लागला आहे.



त्यातच अतिउत्साही तरुणांमुळे अनेकवेळा अपघातही होत असतात. परिणामी रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी पर्यटकांना बंदी केली गेली आहे. त्यामुळे पर्यटक सुरक्षित पर्यटनस्थळांच्या शोधात असतात. त्याकरिता ते माथेरानकड धाव घेताना दिसत आहेत. कारण माथेरानमध्ये काळजी घेतली तर अति धोकादायक असे कोणतेही ठिकाण नाही. दरम्यान, माथेरान मधील गर्द हिरवीगार वनराई पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. सह्याद्री पर्वत रांगांमधील अतिशय घनदाट अरण्यामुळे येथे पाऊस देखील जोरदार कोसळत असतो. या पावसाची मज्जा आणि आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची पावले माथेरानकडे वळत आहेत. त्यामुळे माथेरानमध्ये कुठेही फिरले तरी पावसात भिजण्याचा आनंद मिळतो. वनराईमधून अचानक येणारा पाऊस आणि दाट धुके असा वेगळा अनुभव पर्यटकांना मिळतो. त्यामुळे पर्यटकांनी माथेरानकडे आपली पाऊले वळवली आहेत.

येथील हिरव्यागार डोंगर रांगामध्ये वारा आणि धुक्याच्या खेळात पावसाच्या संततधारेत माथेरानमध्ये अनेक पर्यटक स्वतःला हरवून घेत असतात. त्यामुळे माथेरानमधील पाऊस अनुभविण्यासाठी पर्यटक नेहमी येथे येत असतो. माथेरानमध्ये मागील काही वर्षांमध्ये झालेल्या प्रचंड जंगल तोडीमुळे येथे पावसाचे प्रमाण कमी झाले होते. मात्र, यंदा दि.२८ जून पासून सुरु झालेला पाऊस अद्याप थांबलेला नाही. मात्र, माथेरान उंच डोंगरावर वसले असल्याने येथे कोसळणाऱ्या पावसाची तीव्रता अधिक जाणवत नाही. जुलै महिन्यात पावसाने मोठ्या प्रमाणात बॅटिंग सुरू केली आहे. जुन्याजाणत्या लोकांच्या सांगण्याप्रमाणे आषाढ महिन्यात येथे जोरदार पाऊस कोसळत असतो. पावसाने अवघ्या १० दिवसांत २००० पेक्षा अधिक मिली पावसाची नोंद केली आहे. त्यामुळे वर्षा सहलीसाठी येणारे पर्यटक खुश आहेत.

# बोरमाच गावाचा रस्ता बंद

## ● ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण ● जीवनावश्यक वस्तूसाठी माणगावपर्यंत पायपीट

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील निजामपूर परिसरातील दुर्गम आणि डोंगराळ बोरमाच गावावर निसर्गाने अक्षरशः संकटाचा डोंगर कोसळवला आहे. गावालगतच्या डोंगरमाथ्यावरून प्रचंड दरड कोसळल्याने गावाकडे जाणारा एकमेव रस्ता पूर्णपणे बंद झाला असून, संपूर्ण गावाचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ग्रामस्थांमध्ये भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे.



गेल्या चार दिवसांपासून रस्त्यावर मोठमोठे दगड, माती आणि झाडांचा ढिगारा पडून असल्यामुळे कोणतेही वाहन गावात पोहोचू शकत नाही. त्यामुळे आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांसह संपूर्ण गावाला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेल्या अन्नधान्य, औषधे, दूध, गॅस आणि इतर जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी ग्रामस्थांना निजामपूर किंवा माणगावपर्यंत अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. बोरमाचमध्ये सुमारे ८० घरे असून काही कुटुंबे भीतीपोटी गाव सोडून नातेवाईकांकडे गेल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. सततच्या पावसामुळे डोंगरातून आणखी दरड कोसळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने प्रत्येक क्षण ग्रामस्थांच्या मनात धास्ती निर्माण करत आहे. रात्रभर झोप लागत नाही; पुन्हा दरड कोसळली तर काय होईल? असा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.

या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या असून रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र दरडीचे प्रमाण मोठे असल्यामुळे अद्याप वाहतूक सुरू होऊ शकलेली नाही.

ग्रामस्थांनी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे तातडीने नवीन आणि सुरक्षित रस्ता निर्माण करण्याची मागणी केली आहे. या मागणीची दखल घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले आहे. बोरमाच गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करणार असल्याचे सांगितले. गावकऱ्यांच्या अडचणी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले. निजामपूर परिसर सह्याद्रीच्या कुशीत वसलेला असल्याने मुसळधार पावसात दरडी कोसळण्याचे प्रकार वारंवार घडतात. त्यामुळे या भागातील डोंगरपायथ्यावरील गावांचे भवितव्य दरवर्षी पावसाच्या दयेवर अवलंबून राहते. अशा घटना टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वी भू-सर्वेक्षण, संरक्षण भिंती, पाणी निचरा व्यवस्था आणि धोकादायक उतारांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. बोरमाचमधील प्रत्येक कुटुंब मदतीच्या प्रतीक्षेत आहे. गाव पुन्हा सुरक्षित व्हावे, रस्ता खुला व्हावा आणि भीतीच्या सावटातून मुक्ती मिळावी, हीच येथील नागरिकांची आर्त हाक आहे.

# बोर्लीपंचतनच्या प्राचीन शंकर मंदिराचे उद्‌घाटन



**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राचीन शंकर मंदिराच्या पुनर्बांधणीचे काम लोकसहभाग आणि श्रद्धेच्या बळावर यशस्वीरीत्या पूर्ण झाले. नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिराचा उद्‌घाटन व नुतन मुर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवारी (दि.९) जुलै रोजी अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

सोहळ्यानिमित्त वास्तूशांती, होमहवन, कलशारोहण आदी धार्मिक विधी पार पडले. सोहळ्याप्रसंगी मंदिराचे विश्वस्त अध्यक्ष इंद्रकांत हावरे यांनी मंदिर उभारणीसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व भाविक, ग्रामस्थ, दाते, व्यापारी आणि मंदिर समितीच्या सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शासकीय निधीची प्रतीक्षा करत न बसता भाविकांनी मंदिर उभारणीची जबाबदारी स्वीकारली. नव्या स्वरूपात उभी राहिलेली ही मंदिराची वास्तू श्रद्धा, निर्धार, आणि लोकसहभागाच्या सामर्थ्याचे प्रेरणादायी प्रतीक आहे असे त्यांनी सांगितले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १२ जुलै

१) श्री.शशिकांत देवजी कवळे
मु.गाण तर्फे परहुर,
दि.१२-७-१९४४

२)श्रीम.निर्मला काशीनाथ गायकवाड
श्रीबाग-२, अलिबाग,
दि.१२-७-१९५६

३) श्री.नरहरी दामोदर पाटील
श्रीबाग-२, अलिबाग,
दि.१२-७-१९५४

४) ज्योती अनंत जोशी
ब्राम्हणआळी, अलिबाग,
दि. १२-७-१९६५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. पोशीबाई दामोदर खाडे, पुण्यस्मरण, तरशेत पेण**

## नुकसानग्रस्त ग्रामस्थांना मदत

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील ऐनवहाळ गावात अनेक कुटुंबांच्या घरांवरचे पत्रे उडाल्याने मोठे नुकसान झाले होते. अशा प्रसंगी प्रमोद म्हसकर नुकसानग्रस्त ग्रामस्थांना घरांसाठी पत्र्यांचे वाटप करण्यात आले.

## कृष्णा पाटील यांना पितृशोक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उलवे नोडमधील मोरावे गावचे अर्जुन भोकाजी पाटील यांचे गुरुवारी (दि.९) निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते.



त्यांच्या पार्थिवावर मोरावे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्ययात्रेला महेंद्र घरत यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार, १८ जुलै रोजी लांगेश्वर येथे, तर उत्तरकार्य मंगळवार, २१ जुलै २०२६ रोजी 'अर्जुन भवन' मोरावे येथे करण्यात येणार आहे.

# २० वर्षे जपलेले झाड कोसळले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रभाग क्रमांक १४ मधील प्रकाश मंगल कार्यालय, रॉयल गार्डन परिसरात सुमारे २० वर्षांपासून जपलेले आंब्याचे झाड कोसळल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, हे झाड अनेक वर्षांपूर्वी लावण्यात आले होते. नियमित पाणी देऊन व काळजी घेऊन ते वाढविण्यात आले होते. त्यामुळे हे झाड केवळ वृक्ष नसून परिसरातील अनेकांच्या भावना आणि आठवणींशी जोडले गेले होते. झाड कोसळल्यानंतर ते पुन्हा उभे करण्याचे प्रयत्न करण्यात आले, मात्र यश आले नाही.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर विकासकामे करताना वृक्षांचे संरक्षण करणे अत्यावश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी लवकरच वृक्ष संरक्षण व संवर्धन मोहिम सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. वृक्षप्रेमी, तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था आणि या मोहिमेत नागरिक, पर्यावरण-संबंधित शासकीय यंत्रणांचा सहभाग घेऊन परिसरातील प्रत्येक वृक्षाचे संरक्षण करण्यावर भर दिला जाणार आहे. विकास आवश्यक आहे, मात्र तो. निसर्गाच्या बळीवर नको, असा संवर्धनासाठी एकत्र येण्याचे आवाहन संदेश देत नागरिकांनी वृक्षसंवर्धन करण्यात आले आहे.

## चंद्रभागा म्हात्रे यांचे निधन

**वढाव :** पेण तालुक्यातील वढाव गावातील चंद्रभागा पांडूरंग म्हात्रे यांचे वयाच्या १०० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे.



चंद्रभागा यांनी ६० वर्षांपूर्वी वढाव प्राथमिक शाळेसाठी वर्गखोल्या उभारण्यासाठी सुमारे १५ गुंठे जमीन दान दिली होती. तसेच त्यांच्या प्रेरणेने त्यांच्या कुटुंबाने २०१६ मध्ये वढाव येथे स्वतःजागा देऊन वीरभद्र देवस्थान मंदिराची उभारणी केली. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, पाच मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दिवसकार्य सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी वढाव येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

# कर्जतमधील आदिवासी वाड्यांचा संपर्क तुटला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतमधील भुतिवलीपासून माथेरानच्या डोंगर रांगेत येणाऱ्या सात आदिवासी वाड्यांना जोडण्या मुख्य रस्त्यावर पाच जुलै रोजी झालेल्या मुसधार पावसामुळे या रास्तावर दरड कोसळ्यामुळे हा रस्ता पुर्णपणे बंद झाल्याने येथील सात आदिवासी वाडयांना जाण्यासाठी संपर्क तुटल्याने या आदिवासी वाडीतील लोकांना पर्यायी रस्ता म्हणुन डोंगर रांगेतून प्रवास करावा लागत असल्याने यांना खुप त्रास सहन करावा लागत होता.



पाळी भूतीवली धरणाच्या समोर असलेल्या सात आदिवासी वाद्यांना जोडणारा रस्ता बंद झाला आहे. या सर्व घटनेची माहिती कर्जत तालुक्याचे प्रांत आधिकारी व तहसीलदार, ग्रामविकास अधिकारी तसेच प्रशासकीय यंत्रणांना यांच्या पर्यांत पोचल्याने तात्काळ ही सर्व शासकीय यंत्रना घटना स्थाळी पोचली व संबंधीत सर्व घटनेची पाहणी करून या रस्त्यावर आलेला सर्व मलवा हाटवण्याचे उदेश देऊन तातडीने हा सर्व मलवा जेसीबीच्या साह्याने हाखवण्यात आलेचे अदेश देण्यात आले. मात्र, हा मलवा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे हा मलवा हाटवण्यासाठी पोकलनची गरज असल्याने या कामात संबंधी यंत्र ना या ठिकाणी पोचू शकत नसल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. या संपुर्ण प्रकरणामध्ये सर्वाधिक महत्वाची बाब म्हणाजे हा रस्ता नेमका कोणत्या विभागामध्ये येतो. या सर्व बाबत प्रशासनाकडे स्पष्ट उत्तर नसल्याचे जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाने ह्या रस्त्याची नोंदीत नसल्याचे बोलण्यात आले. तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही ते आमाच्याकडे नोंद नसल्याची बोलण्यात आले.

दुर्गम भागातील आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना जीव धोक्यात असताना प्रशासन रस्ता कोणाचा यावरच अडकून राहिले आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १२ ते १८ जुलै २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### कामकाजात घाईगडबड टाळा

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहात कामाचे नियोजन केल्यास कामाचा भार कमी होऊ शकेल. खरेदीचे बेत साध्य होतील. खरेदीच्या निमिताने फिरणे ही होईल. मत्र, मित्र परिवारात शाब्दिक चकमकी टाळा. नोकरदारांना दिलासा मिळेल. मनासारखी बढती मिळू शकेल फक्त बदली लांबवर होण्याची शक्यता राहील. त्यासाठी ओळख लावावी लागेल. आर्थिक गुंतवणूक तज्ञांच्या सल्ल्याशिवाय करू नका. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक सावध राहा. विशेषतः उष्णतेचे विकार व अपचन विकार. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. कोणालाही शब्द अथवा आश्वासने देण्याचे टाळल्यास हा आठवडा बऱ्यापैकी चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. कामकाजात घाईगडबड टाळा. विचारपूर्वक निर्णय घ्या. महिलांना अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आपला प्रभाव इतरांवर पाडू शकाल. **महिलांना :** मनावर दडपण न घेता कार्य करत रहा. उधारी बाबत योग्य काळजी घेणे गरजेचे आहे पैशाच्या व्यवहारात सावध राहणे महत्वाचे आहे. **शुभ दिनांक :** १२,१४.

### प्रश्न चर्चेने सोडवा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता आपणास दैनंदिन कामकाजात येणारे प्रश्न वादविवाद न करता चर्चेने सोडविणे अधिक हितकारक ठरेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आपल्या प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार याबाबत सावध राहा. धार्मिक कार्याला वेळ द्याल. सरकारी कामात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. प्रलंबित कामे वेग घेतील. आपली कोणत्याही कारणांनी मानसिकता बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. नातलग, मित्रमंडळीच्या वागण्याने व बोलण्याने आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या हुशारीने, प्रसंगानुरूप वागण्याचा प्रयत्न केल्यास सारे काही साध्य करता येईल. काही भाग्यवंतांना विवाहबाबतचे प्रस्ताव येऊ शकतील. **महिलांना:** येणाऱ्या समस्यांवर आपण त्यांचे निराकरण करू शकाल. आपल्या ध्येयाकडे वाटचाल कराल. घराकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. **शुभ दिनांक :** १५,१६.

### आर्थिक गुंतवणूक टाळा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात आपण स्वकर्तृत्वावर लक्ष केंद्रीत केल्यास पुष्कळशा गोष्टी मनासारख्या होऊ शकतील. घरातील प्रत्येकाला जबाबदारी सोपविण्याची कामगिरी पार पडावी लागेल. एखादा महत्वाचा कार्यक्रम विसरू नका. आर्थिक गुंतवणूक सध्या टाळा. प्रकृती स्वास्थ्याकडे अधिक लक्ष द्या. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार सांभाळा. कष्टाशिवाय यश मिळविता येत नाही हे लक्षात ठेवा. दुसऱ्यावर कामे सोपविण्याआधी स्वयंसिद्ध व्हा. स्वकर्तृत्वावर भर द्या. आपण आपल्या कामावर अधिक लक्ष दिल्यास आपला यशाचा मार्ग अधिक सुकर होईल. आपले इतरांशी मतभेद होणार नाही याची खबरदारी घ्या. जेथे शक्य आहे, तेथे तडजोडीचे धोरण स्वीकारणे योग्य होईल. कुठल्याही मोहाला बळी पडू नका. आपल्या हितशत्रूंना संधी देऊ नका. घराबाबतच्या प्रश्नांना चालना मिळेल. मुलांनी अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. वादविवादापासून दूर राहा. **महिलांना :** हातात धन येणार आहे त्याचा वापर व्यवस्थित करण्याची गरज आहे. एखादी जुनी उधारी आपल्याला परत मिळेल प्रयत्न करा. **शुभ दिनांक : १७,१८.**

### खर्चावर नियंत्रण ठेवा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे सुरुवातीच्या दिवसात व्यावसायिक व व्यक्तिगत संबंधांच्या बाबतीत आपण अधिक उत्साह दाखवाल. आपल्यात कितीही उत्साह असला तरी तो इतरांसाठी त्रासदायी ठरणार नाही याची आपणास काळजी घ्यावी लागेल. आपण जर जीवनातील काही तथ्य समजून घेऊन ते अमलात आणलेत तर हे दिवस आनंदात घालवू शकाल. आपल्या भिन्नलिंगी संबंधातील जवळीक वाढेल. या दरम्यान वस्त्रालंकार, हौसमौज करण्याच्या वस्तू इत्यादीसाठी खर्चाची किंवा खरेदीची शक्यता आहे. आपल्या जवळ आर्थिक सुबत्ता असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवल्यास उर्वरित रक्कम गुंतवणूक करून किंवा अन्य मार्गाने खर्च करून आपल्या फायद्यात वाढ करू शकाल. शक्य असल्यास कर्ज किंवा उधारी करणे टाळावे. काही अनपेक्षित खर्च उदभवल्याने आपणास कर्ज किंवा उधारी करावी लागण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी किंवा सरकारी विभागात शक्यतो अधिकारी वर्गाशी व प्रतिष्ठित व्यक्तींशी वाद टाळावेत. **महिलांना :** घरात एखादी किमती वस्तु येईल, छोटे दुखणे अंगावर काढू नये नाहीतर मोठे दुखणे होऊ शकते. **शुभ दिनांक :** १२,१५.

### नोकरदारांना दिलासा मिळेल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता ते बऱ्यापैकी आहे. हातात पैसे येतील बचत करू शकाल. आपण करीत असलेल्या कार्याला प्रयत्नांची जोड दिल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. आपले कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कायद्या विरुद्ध असलेली कामे टाळावीत वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दखल घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. ग्रहमान पाहता ते बऱ्यापैकी आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. मित्रमंडळी, आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे इष्ट राहील. गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दखल घ्या. प्रकृती स्वास्थ्य जपा. घरगुती कामकाजांना प्राधान्य द्या. हातावेगळे करण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** या आठवड्यात आपल्याला भेट मिळेल. जिवलगा बरोबर बाहेर जाण्याचा बेत तडीस जाईल. **शुभ दिनांक :** १३,१६.

### ज्येष्ठांशी सल्लामसलत करा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे आपले ग्रहमान पाहता आपण कोणतीही, कसलीही चिंता न करणे आपणास हितकारक ठरू शकते. चिंता करून प्रश्न सुटत नाही, पण त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. तेव्हा मनात येईल तसे वागण्याचा प्रयत्न करा. घरच्या समस्या सोडविता येतील. महत्त्वाचे निर्णय ज्येष्ठांशी सल्लामसलत करूनच सोडविण्याचा प्रयत्न करावा. वैवाहिक जीवनात सामंजस्याने वागणे योग्य राहील. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता असते. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. सरकारी नियमांचे पालन करा, आपण आपले अस्तित्व शाबूत ठेवण्यास हा काळ उत्तम आहे. पर्यायाने आपण योग्य वेळी त्याचा योग्य उपयोग करून घ्या. मात्र, कायदा व नियम यांचे पालन कटाक्षाने करा. आपल्या कार्यक्षेत्रात वरिष्ठांची उत्तम साथ मिळू शकेल. सकारात्मक दृष्टिकोनातून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **महिलांना :** महिलांना आरोग्याच्या बाबत्तीत उत्तम कालावधी आहे. स्पर्धेत बाजी मारू शकाल, शत्रूना त्यांची जागा दखवून द्याल. **शुभदिनांक : १६,१७.**

### प्रवासात सावधानता बाळगा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपले आर्थिक बजेट वाढणार असल्याने आपण प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावेत. त्याचप्रमाणे सरकारी नियम व कायद्यांचे कटाक्षाने पालन करावे. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. व्यापार-उद्योगात प्रगती करण्याची संधी मिळेल. प्रकृतीबाबत अधिक खबरदारी घ्यावी. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. आपल्या कामात वेळीच स्वतः लक्ष द्या. दुसऱ्यास ढवळाढवळ करण्यास वाव देऊ नका. आजारच्या बाबतीत विशेषतः मोसमी आजार होणार नाहीत याची काळजी घ्या. आपल्या बोलण्याने गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. चुकीचा मार्ग स्वीकारणे कटाक्षाने टाळा. लांबवर प्रवास करण्याचा बेत आखाल, आपले परगावी असलेले नातलग घरी येतील त्यांच्याकडून लाभ संभवतो आहे. **महिलांना :** एखादी चांगली बातमी कानावर पडणार आहे. मुलांची प्रगती अनुभवायला येईल, धन लाभ होईल. **शुभदिनांक :** १५,१८.

### विचारपूर्वक निर्णय घ्या

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपली अडकलेली कामे पूर्ण होतील. नवीन नोकरीसाठी प्रयत्न केल्यास यश मिळेल. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. मोठी गुंतवणूक करण्यास हरकत नाही बोलण्यावर योग्य नियत्रण ठेवावे. त्यामुळे होणारी भानगड टाळता येईल. शक्यतो रात्रीचे जागरण टाळावे. **महिलाना :** वड्याचे तेल वांग्यावर काढू नका. आपला राग आपल्या ताब्यात ठेवलात तर आपल्याला कोणीच जिंकू शकणार नाही. आपली वेळ आली की आपल्या परड्यात भरभरून दान पडणार आहे त्यासाठी संयम आवश्यक आहेः **शुभदिनांक : १४.१६.**

### व्यवसायातील मतभेद टाळा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, मोसमी आजारापासून सावध राहा. नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू पडण्याचा प्रसंग आला तरी सावध राहून वागा. कला क्रीडा यात आपले मन रमणार आहे. खेळाडूंना सुवर्ण संधी मिळण्याचे योग आहेत. अडकलेली कामे यावेळी पूर्ण करू शकणार आहात. विशेषता पासपोर्ट बाबतचे काम पूर्ण होऊ शकेल. **महिलांना :** उधारी घेऊ नका देऊ नका. डोक्यावर ताण यणारे काम करू नका हवी तर योग्य विश्रांती घ्या, त्यामुळे कामाला हुरूप येईल. **शुभ दिनांक :** १२,१३.

### कुटुंबांसाठी अधिक वेळ द्या

**मकर :** राशीसाठी या सप्ताहात कुटुंबांसाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या.सर्व बाबतीत आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कलाकारांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. दुसऱ्याच्या मताने कोणतेही काम करू नका सल्ला फक्त आपल्याच माणसाचा घ्या. थोडे काम थोडा आराम हे धोरण लांब ठेवणे हिताचे आहे. **महिलांना :** वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा कळवधी अत्यंत शुभ आहे. घर, गाडी, बंगला या बाबत केलेली हालचाल सत्कारणी लागेल. आपले खिसा पाकीट भरलेले राहील फक्त ते सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. **शुभ दिनांक :** १४,१५.

### प्रलोभनात अडकू नका

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. त्यामुळे घरातील वातावरण आनंदी राहील, नसीबाची साथ नसली तरीही चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. नाहीतर विसरभोळेपणा अभ्यासास मारक ठरू शकतो. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपण आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. कौटुंबिक वावविवाद टाळा. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. कितीही राग आला तरी शांततेच धोरण ठेवणे आपल्याला हितकारक आहे. मुलांकडे नीट लक्ष द्यावे लागेल. **महिलांना :** आपण तीर्थयात्रेचा बेत केला असेल तर त्याला पूर्ण रूप देण्यास हरकत नाही. बऱ्याच दिवसांनी पर्स गरम राहील. सोने खरेदी करू शकाल. **शुभ दिनांक :** १६,१७.

### काम चिकाटीने पूर्ण करा

**मीन :** राशीसाठी या सप्ताहात आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे जोडीदाराकडून प्रेमाचा वर्षाव होईल. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. नोकरदारांनी कामावर व्यवस्थित लक्ष देणे गरजेचे आहे. लहानशी चूक ही त्रासदायक ठरू शकते. मित्रवर्गांकडून दिलासा मिळेल. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. प्रलोभनापासून दूर राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्यपाळा. आर्थिक बाजू ठीक राहील. आपणास येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरू शकते. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आपण आपले आत्मपरीक्षण करणे योग्य. हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करण्यासाठी तयारी ठेवा. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाहीत, याची दक्षता घ्या. सकारात्मक विचार करून मानसिकता चांगली ठेवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** मनातील साचलेले विचार दूर सारले तर कामातील प्रगती वेगात होईल मुलांची प्रगती सुखावह ठरणारी असेल. **शुभ दिनांक :** १२,१८.

# पावसाचा स्मशानभूमीला फटका



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. त्याचा फटका माजगाव ग्रुप ग्राम पंचायत हद्दीतील स्मशानभूमीलाही बसला आहे. पाताळगंगा नदीच्या काठावर असलेली माजगाव येथील स्मशानभूमी नदीच्या पाण्याने जलमय झाल्याने तिची दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यामध्ये ही स्मशानभूमी पूर्णपणे पाण्याखाली गेल्यामुळे पुराचे पाणी निघून जातात ही भयावक स्थिती समोर आली आहे.

सततच्या पावसामुळे पाताळगंगा नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून नदीचे पाणी थेटस्मशानभूमीपर्यंतपोहोचलेआहे. त्यामुळे अंत्यविधीसाठी आवश्यक असलेली जागा चिखलमय झाली आहे. स्मशानभूमीतील परिसरात पाणी साचल्याने अंत्यसंस्कार करणे धोकादायक आणि अत्यंत कठीण झाले आहे.

मुसळधार पावसाने संपूर्ण परिसरात मोठे नुकसान केले असून अनेक ठिकाणी रस्ते, शेती आणि सार्वजनिक सुविधांचेही नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत स्मशानभूमीचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे ग्रामस्थांची चिंता अधिकच वाढली आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यास या ठिकाणी जाण्यासाठी खूप कष्टमय प्रवास करावा लागत असल्याचे ग्रामस्थ म्हणत आहेत.

> “पाताळगंगेला आलेला मोठ्या पुरामुळे माजगाव स्मशानभूमी पूर्णपणे पाण्याखाली गेल्याचे निदर्शनास आले होते. मात्र, पाऊस कमी झाल्यानंतर स्मशानभूमी दुरावस्था निदर्शनास आली. या या संदर्भात पाहणी करून आवश्यक सुविधांची उभारणी करण्यात येईल.
> – संदीप धारणे
> ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत माजगाव.”

> “या वर्षीचा पाऊस अत्यंत भयावक परिस्थितीचा असून याचा फटका शेती रस्ते तसेच माजगाव येथील असलेले स्मशानभूमीला बसला आहे. या मार्गातून जाणारा रस्ता तसेच या पायऱ्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था या ठिकाणी निर्माण झाली आहे. नदीच्या प्रवाहात आलेला मोठ्या प्रमाणात कचरा गाल, माती या ठिकाणी जमा झाली आहे.
> –जयवंत पाटील
> कृषी उत्पन्न बाजार समिती खालापूर उपसभापती”

## राजमाता जिजाऊंची पुण्यतिथी साजरी

**महाड :** राजमाता जिजाऊ यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त पाचाड येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रेरणा सावंत, चंद्रकांत कळंबे, मनाली काळीजकर, मनोज काळीजकर, सुरेश महाडीक, बाळ राऊळ, जितेंद्र सावंत, गटविकास अधिकारी साळुंखे, भागवत राजे जाधवराव, सीमा बेंदुगडे, अनिकेत जाधव, महेश शितोळे, अनिल जाधव, चेतन अवकीरकर, संदीप खिडबिडे, नितीन पावले, बंडू तरडे, रोहिदास अंबावले, रोहित पवार, संतोष गायकवाड, रघुवीर देशमुख, आनंद देशमुख, रणजित जाधवराव, विष्णू केंजळे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. बलीवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. गौरवकुमार राजेंद्रकुमार कोठारी २) श्री. संजय भगवतीलाल कोठारी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे -

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| १७७ | १२ /क/२ | २-५५-० | १-८५ |
| १७८ | ५/२ | १-४३-० | ०-८० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १२/०७/२०२६

**अॅड. राकेश भरत भोईर**
ऑफीस -कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. शरद मदनलाल मुतडा वगैरे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री. दत्तात्रय महादू कडव यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. भानसोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २७ | | ०-५९-७०<br>पो.ख. ०-०५-८० | १०-०६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १२/०७/२०२६.

**अॅड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

### आवास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड

नोंदणी क्र.: आर. जी.डी./के.जे.टी./एच.एस.जी./टि.सी./६४४/१९९९-२०००/ सन १९९९
नानामास्तर नगर, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांना या जाहिरातीने सुचित करण्यात येते की, सर्वे नंबर १२/२/ब/१/अ/१ सत्ता प्रकार 'क' मौजे मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूखंडावर विद्यमान मालक आवास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. जिचा नोंदणी क्र. आरजीडी/केजेटी/एचएसजी (टीसी)/६४४/१९९९-२००० सन १९९९ आहे. आम्ही आमची इमारत पुनर्बांधणीसाठी देण्याचे सर्वानुमते निश्चित केले आहे त्यासाठी संस्थेने बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांचेकडून स्वारस्य आहे त्या विकासकाने सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत खालील सही करणारे अध्यक्ष श्री. इलियास अब्बास कर्जतवाला व श्री. सचिव गौतम लक्ष्मण ढोले व खजिनदार श्री. जाकीर मोहसिन कर्जतवाला आवास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मुद्रे (बुद्रुक), नाना मास्तर नगर, ता. कर्जत जि. रायगड पिन ४१०२०१ यांच्याकडे पाठवावेत.

दिनांक : १२/०७/२०२६

सचिव
सही / -
**अध्यक्ष/सचिव/खजिनदार**
**आवास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**
आवास को. ऑप. हौ. सोसायटी लि.
नाना मास्तरनगर, मुद्रे (बु.),
कर्जत, जि. रायगड - ४१० २०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उतान्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जॉन थॉमस वेंगालुर | ११ | १५ | ०-४५-०० | ० | ३० |
| | यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२२-५० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही /-
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

**अॅड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१२/०७/२०२६

### जाहीर नोटीस

सर्व संबधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वावे, ता.अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत श्री. किशोर गणपत नाईक यांच्या मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| वावे, ता.अलिबाग जि. रायगड. | १०१ | जिरायत ०-२३-८०<br>पो.ख.०-००-५०<br>एकुण ०-२४-३० | ५.१२ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तीनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून (पंधरा) १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण -अलिबाग
दिनांक : ११/०७/२०२६

**अॅड. अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ८८०५०३७४७४

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री. मनिष सभाजित सिंग सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निवृत्ती अण्णा म्हसे यांचे कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १७ | २ | १.५५.००<br>पोट.ख. ०.१८.००<br>एकूण : १.७३.००<br>पैकी ०.९३.०० हे.आर.चौ. मीटर या क्षेत्राची. | ०.८५ |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १२/०७/२०२६.

सही /-
**अॅड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८०८७४३०४४७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचे सोबत सुरु आहेत. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५९/१ | एकूण क्षेत्र १-६१-९० हे.आर<br>या मिळकतीपैकी श्री.दीपक काशिनाथ पाटील व इतर ८ यांचे मालकीचे विक्री क्षेत्र १-०७-९३ हे.आर | २३.४४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-१२/०७/२०२६

**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिरजवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धिरज किसन केणी, रा. उरण, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- पोटलज खुर्द, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| ९२ | ०-६८-०० | ०.२५ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ९/०७/२०२६

सही /-
**अॅड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| हनुमंत तुकाराम देशमुख | ३२ | १९ | १-१०-०० | ० | ६२ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-३७-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही/-
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

**अॅड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १२/०७/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे अडुळसे, ता.- सुधागड, जि.- रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| पूजा प्रकाश सुर्वे | २२१/३ | ला. योग्य १-००-००<br>पो.ख. ०-२३-००<br>एकूण.१-२३-०० | ०.६५ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहण नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**अॅड. सोनाली गंगाधरे शहासने**
''सीता-सदन'' वाकण, पो.- पाटणसई,
ता.-रोहा, जि.-रायगड, ४०२१०६
मो.क्र.७७७७८९०४५५
advsonalishahasane@gmail.com

### जाहीर नोटीसबाबत खुलासा

श्रावण तुकाराम जाधव, मुक्काम फ्लॅट नंबर २, तळमजला, ए विंग, शिवसागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., टेलिफोन एक्सचेंज जवळ, चेंढरे, अलिबाग तर्फे अॅड. उमेश बाळकृष्ण म्हात्रे, श्रीबाग अलिबाग यांनी तारीख ०८/०७/२०२६ रोजीच्या ''दैनिक कृषीवल'' मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसबाबत आमचे अशिल रोहित श्यामकांत घरत यांचेवतीने खुलासा खालीलप्रमाणे :-

श्रावण तुकाराम जाधव यांचेवतीने प्रसिद्ध करण्यात आलेली सदर नोटीस खोटी व अर्धवट माहितीवर आधारित असून, अपील कोर्टाने दिलेला निकाल उघड न करता देण्यात आली आहे.

रेग्युलर मुकदमा १७९/२०१० मध्ये कोर्टाने दिलेल्या न्यायनिर्णयाविरुद्ध आमचे अशिलांनी रायगड जिल्हा कोर्टामध्ये दिवाणी अपील ६५/२०१३ या क्रमांकाचे अपील दाखल केले होते. सदर अपीलामध्ये तारीख ०७/०२/२०२६ रोजी निर्णय झाला असून, रेग्युलर मुकदमा १७९/२०१० मधील निकाल जिल्हा कोर्टाने रद्दबातल केला आहे आणि आमचे अशिलांचा दावा मंजूर केला आहे. सदर निवासी गाळ्यावर श्रावण तुकाराम जाधव यांचा मालकीहक्क नसून, तो निवासी गाळा त्यांनी कोर्टाचे निकालापासून दोन महिन्यात आमचे अशिलांचे ताब्यात द्यावा असा स्पष्ट आदेश करण्यात आला आहे. ताबा न दिल्यास दरमहा रुपये ५०००/- यानुसार नुकसान भरपाई श्रावण जाधव यांनी आमचे आशिलांस द्यावी असाही आदेश अपील कोर्टाने केला आहे. सदर अपीलाबाबत आणि त्यामध्ये झालेल्या न्यायनिर्णयाबाबत हेतूतः उल्लेख सदर जाहीर नोटीसीमध्ये करण्यात आलेला नाही.

तरी शिवसागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी येथील, ए विंग पैकी तळमजल्यावरील निवासी गाळा नंबर २ हा गाळा आमचे अशिलांचे मालकीचा असून, तो श्रावण तुकाराम जाधव यांनी आमचे अशिलांचे ताब्यात देण्याबाबत जो आदेश झाला आहे त्यानुसार ताबा मिळविण्याकरिता आमचे अशिलांनी अलिबाग येथील दिवाणी कोर्टात रेग्युलर दरखास्त २७/२०२६ या क्रमांकाचा दरखास्त अर्ज दाखल केला असून, सदर निवासी गाळ्याचा ताबा श्रावण जाधव यांचेकडून मिळवण्याबाबत कारवाई सुरू केली आहे. तरी आमचे अशिल सदर निवासी गाळ्याचे मालक असून, त्याबाबत विक्री अथवा अन्य योग्य ती कृती करण्याचा आमचे अशीलांस पूर्ण अधिकार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी आणि श्रावण तुकाराम जाधव यांनी प्रसिद्ध केलेल्या खोडसाळ जाहीर नोटीसमधील मजकूराकडे दुर्लक्ष करावे. श्रावण जाधव सदर निवासी गाळ्याचे मालक नाहीत. तरी, त्यांचेबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करू नये.

अशाप्रकारे जाहीर नोटीस प्रसिद्ध करून खोटी माहिती लोकांना पुरवून आमचे अशिलांचा मालकीहक्क आव्हानित केल्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई श्रावण जाधव यांचेविरूद्ध आमचे अशील करणार आहेत. कळावे.

तारीख : ११/०७/२०२६

सही/-
**अॅड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप, हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल : ९२७०१६२९२९

दिनांक : १२/०७/२०२६

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) पूनम उन्मेश नाईक, २) अर्पित उन्मेश नाईक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगांव ता.अलिबाग | ६९ | ०-५८-००<br>पो.ख. ०-०१-७०<br>एकुण ०-५९-७० | ६.५८ |
| वर नमुद मिळकतीमधील १) पूनम उन्मेश नाईक, २) अर्पित उन्मेश नाईक यांच्या असलेल्या अविभक्त हिश्याबाबत | | | |

दिनांक : १२/०७/२०२६
अशिलांची सही

**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे रेवोळी, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिलांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.काशिनाथ गोपाळ नावले व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदीखतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| रेवोळी | १०० | ०.३८.००<br>पो.ख. ०.३७.००<br>एकूण क्षेत्र ०.७५.०० | ०.५० |

वरील संपुर्ण क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही
ठिकाण : पेण
दि. १२/०७/२०२६

**अॅड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आम्ही खालील वर्णनाची जमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदर जमीन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असून रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मौजे-वंजारवाडी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे/ हिस्सा नंबर | क्षेत्र - हे आर.पॉ | आकार रु. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६/२ | एकुण क्षेत्र-१-०७-७०<br>यापैकी क्षेत्र - ०-४३-०८ | ०-९१ | १) श्री.मुरलीधर सुनिल चौधरी<br>२) सौ.प्राची मुरलीधर चौधरी |
| ६/२ | एकुण क्षेत्र १-०७-७०<br>यापैकी क्षेत्र-०-२१-५४ | ०-४६ | ३) श्री.गरीष मधुकर धांडे<br>४) सौ.वैशाली गरीष धांडे |
| ६/२ | एकुण क्षेत्र १-०७-७०<br>यापैकी क्षेत्र -०-२१-५४ | ०-४२ | ५) सौ. विजया मनोज चौधरी<br>६) श्री. मनोज सुनिल चौधरी |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आंत खालील सही करणार यांचे पत्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक - १०/०७/२०२६

सही/-
**श्री. अशोक मोतीराम चावला**
रा- बी ९०३-९०४ बरोकहील टॉवर्स,
३ क्रॉस लेन, लोखंडवाला कॉम्प्लेक्स,
अंधेरी वेस्ट, मुंबई ४०००५३
मोबाईल नंबर ७७६७९६६६८२


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- रॉयल मोटर विद्यानगर अलिबाग येथे १२०० sqft कार्पेट 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व- ९९७५४९०१६४
- नामांकित कंपनीला हाऊसकिपींग/घरकाम करण्यासाठी विनापाश किंवा अविवाहीत महिला पाहिजे व रोज ८ तास काम, सरकारी मान्यतेप्रमाणे पगार, PF आणि विमा तसेच राहणे व जेवण सहीत संपर्क– ७७७५८०२२३२
- सकाळी ८–९ या वेळात आणि ८.१५ ते १० या वेळेत घरकामासाठी दोन वेगवेगळ्या बायका पाहिजे आहेत. संपर्क – ९२८४५५५३१४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या घडामोडी घडतील. घरगुती प्रश्नांचा ताण राहील. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील.
- **वृषभ** : जुनी प्रकरणं पुन्हा उद्‌भवू शकतात. बोलताना. वागताना पुरेशी काळजी घ्या. संयम बाळगावा.
- **मिथुन** : उपजत कला-गुणांना वाव मिळेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कर्क** : कार्यकुशलतेतून उत्कर्ष साधता येईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. अनावश्यक खर्च टाळावा.
- **सिंह** : साऱ्या गोष्टी मनासारख्या घडतील. प्रियजनांच्या भेटी होतील. गृहसजावटीला अधिक वाव मिळेल.
- **कन्या** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. नसत्या बाबींचा अधिक विचार करू नका. प्रकृती सांभाळावी.
- **तूळ** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. जुनी येणी वसूल होतील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **वृश्चिक** : नव्या विचारांना चालना मिळेल. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **धनु** : भांवडांशी मतभेद संभवतात. व्यवसायात अचानक अडचणी येतील. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **मकर** : अनुभवींच्या सल्ल्याचा लाभ होईल. दूरचा प्रवास शक्यतो टाळावा. स्थावर प्रश्न ताण वाढवतील.
- **कुंभ** : गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. कामात अपेक्षित प्रगती होईल. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. कलाकारांचा उत्साह वाढेल. विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.

हेल्थ टॉक

## यामुळे होतो मूतखडा

३० ते ६० या वयोगटातल्या महिलांमध्ये पित्ताचे खडे, मूतखडा यांचं प्रमाण अधिक असल्याचं आढळून आलं आहे. मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग, प्रजनन क्षमता कमी होणं, ताणतणाव यांचा मूत्रपिंड आणि यकृतावर विपरित परिणाम होत असल्याने महिलांमध्ये मूतखड्याचं प्रमाण वाढत आहे. गरोदरपणात महिलांना आरोग्यविषयक तक्रारींना सामोरं जावं लागतं. यासह लोहाची कमतरता, अपुरी झोप, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणं या कारणांमुळेही पित्ताचे खडे, मूतखडा या व्याधी होऊ शकतात. अधिक मीठ खाणाऱ्या महिलांना हे विकार जडू शकतात. मिठातल्या सोडियममुळे मूतखडाच नाही तर मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता वाढते. भरपूर चहा-कॉफी पिणाऱ्या महिलांना मूतखडा होऊ शकतो. अपुरी झोप मूतखड्याला आमंत्रण देऊ शकते. कमी पाणी प्यायल्यामुळे मूतखडा होऊ शकतो. स्वच्छतागृहांचा अभाव किंवा इतर कारणांमुळे महिला मूत्र बराच काळ रोखून धरतात. हे चुकीचं आहे. या सवयीचे आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतात. गोड पदार्थांचं अतिसेवन, मद्यपान, औषधांचं अधिक प्रमाणात सेवन अशा कारणांमुळेही मूतखडा आणि पित्ताचे खडे होऊ शकतात.

## १२ जुलै

दिन विशेष

- २०१३ : ज्येष्ठ अभिनेता प्राण यांचं निधन.
- २०१५ : विंबल्डन टेनिस स्पर्धेत भारताच्या लिअँडर पेसने मार्टिना हिंगीसबरोबर मिश्र दुहेरीचं विजेतेपद पटकावलं.
- २०१७ : भारताच्या महिला क्रिकेट संघाची कर्णधार मिताली राजचा एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक धावांचा विक्रम.
- २०१८ : मानवता, शांतता आणि शाकाहाराचे पुरस्कर्ते, आध्यात्मिक गुरू (दादा) जे.पी.वासवानी यांचे निधन.

स्मार्ट टॉक

## इंटरनेट सुरक्षेचे पाच ‘पी’

इंटरनेट सुरक्षेचे पाच ‘पी’ आहेत. त्यांच्याकडे लक्ष दिलं की तुमचं गॅजेट सुरक्षित राहू शकतं. कोणते आहेत हे पाच ‘पी’? जाणून घेऊ.

* पासवर्डमुळे फोनमधलं ॲप सुरक्षित रहातं. त्यामुळे तुमचा पासवर्ड वेगळा असायला हवा. पासवर्ड जास्तीत जास्त सक्षम करण्यावर भर द्या. वेगवेगळी लेटर्स, स्पेशल कॅरेक्टर्स, नंबर्सचा वापर करून पासवर्ड बनवा.

* प्रायव्हसी सेटिंग हा अजून एक महत्त्वाचा पी. सोशल मीडियावर हा ऑप्शन असतो. याचा वापर करून तुम्ही तुमची खाती सुरक्षित ठेऊ शकता.

* ब्राउजर अॅड्रेस बारवर पॅडलॉक हा सिंबॉल असतो. पॅडलॉक असेल तर ती वेबसाईट सुरक्षित आहे. अशीच वेबसाईट ओपन करा.

* सोशल मीडिया ॲपवरच्या प्रोफाइलमध्ये मोजकीच माहिती भरा. प्रोफाइल पिक्चर, सोशल मीडियावर पोस्ट केलेले फोटो यांच्या सुरक्षेची काळजी घ्या.

* पाचवा पी म्हणजे पर्सनल इन्फॉर्मेशन. सोशल मीडिया साईटवर तुमची वैयक्तिक माहिती नोंदवू नका. मोबाईल नंबर, शाळेचं नाव, घरचा पत्ता कोणाला सांगू नका. तुम्ही घरी एकटे असल्याची पोस्टही टाकू नका.

आरोग्यमंत्र

## डोकेदुखीकडे दुर्लक्ष नको

डोकेदुखी ही सर्वसाधारण आरोग्य समस्या समजून त्याकडे फारसं लक्ष न देणाऱ्यांची संख्या बरीच जास्त आहे. मात्र वारंवार तीव्र स्वरुपाची डोकेदुखी उद्‌भवत असेल तर काळजी घ्यायला हवी. अन्यथा, एखाद्या गंभीर विकाराचा सामना करावा लागू शकतो. सततची डोकेदुखी हे ब्रेन ट्युमर अथवा मायग्रेनसारख्या गंभीर विकाराचं लक्षण असू शकतं. म्हणूनच डोकेदुखीबरोबरच विस्मरण, शरीराचं संतुलन बिघडणं अशा स्वरूपाची लक्षणं दिसत असतील तर वेळीच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा तसंच आवश्यक त्या तपासण्या करायला हव्यात. सततच्या डोकेदुखीत डोळ्यांच्या आजूबाजूला तसंच वरील बाजूस तीव्र वेदना होत असतील तर ऐकीव माहितीप्रमाणे उपचार करू नयेत. या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास डोळे लाल होणं, डोळ्यातून पाणी वाहणं तसंच नाकातून पाणी वाहणं अशा प्रकारच्या त्रासाला सामोरं जावं लागतं. याचा डोळ्यांवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. डोकेदुखीची समस्या एक आठवड्यापर्यंत राहिली तर चिंतेचं कारण असतं. सततची चिंता, वाढते ताण-तणाव यामुळे तीव्र डोकेदुखीचा सामना करावा लागतो. यातून अन्य काही विकारही निर्माण होतात. हे लक्षात घेता चिंता तसंच ताण-तणाव निर्माण होणार नाहीत याची पुरेशी काळजी घ्यावी. कपाळ, नाक तसंच गालांच्या हाडांमध्ये वेदना होत असतील तर ते सायनसचं लक्षण असू शकतं. यात सर्दी, ताप तसंच चेहऱ्यावर सूज येणं अशा स्वरूपाची लक्षण पहायला मिळतात.



पंचांग

**रविवार, १२ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ कृ. १३, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : रोहिणी/मृगशीर्ष, योग : वृद्धि, सूर्योदय ६.११ सूर्यास्त ७.१८

फॉरवर्ड्स

**लिबास.. शक़्ल.. ज़ुबान.. झूठ बोलतीं हैं...**

**असलीयत क़ा पता वक़्त आनें पर चलता हैं...!**

फिटनेस फंडा

दोस्तांनो, जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी आळस सोडायला हवा. उठसूट बाईकचा वापरही टाळायला हवा. व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना नीट म्हणजेच नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस असं म्हटलं जातं. नीट म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ. (क्रमश:)

करिअरवाटा

## शिक्षणक्षेत्रातील संधींचा लाभ घ्या

विद्यार्थी घडवण्याबरोबरच शिक्षणक्षेत्रात अन्य संधींबाबतही जाणून घ्यायला हवं कारण इथेही कारकिर्दीचे चांगले पर्याय सापडू शकतात. याविषयी... * या क्षेत्रात योग्य व्यवस्थापनासाठी मॅनेजर्सना बरीच मागणी आहे. शैक्षणिक संस्थेच्या विकासाची पूर्ण जबाबदारी या मॅनेजर्सच्या खांद्यांवर असते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला शाळा किंवा कॉलेजच्या कार्यप्रणालीची जाण असायला हवी. तसंच काही कौशल्यं आणि प्रशिक्षणाचा अनुभव असणंही गरजेचं ठरतं. * सध्या शिक्षणक्षेत्रातही ऑनलाईन माध्यमं उपलब्ध होत आहेत. विविध ॲप्सच्या माध्यमातून तरूणाई शिकत आहे. अशा परिस्थितीत शैक्षणिक लेखकांची मागणी वाढली आहे. हे तज्ज्ञ अभ्यासासाठी आवश्यक तो मजकूर उपलब्ध करून देतात. ब्लॉग्ज, प्रबंध, लेखांसह ऑनलाईन शैक्षणिक मजकूर तयार करण्याची जबाबदारी यांच्यावर असते. अभ्यासू वृत्ती असेल तर या संधीचा लाभ घेता येईल. * कौशल्य प्रशिक्षण व्यवस्थापक हे प्रशिक्षकांच्या कार्यावर लक्ष ठेवून असतात. कर्मचाऱ्यांचं व्यवस्थापन, प्रशिक्षण यासाठी ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.



खेचाखेची

### जन्म

**बंता** : ऑक्सिजन जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. या वायूचा शोध १७७३ साली लागला.

.
.
.
.
.
.

**संता** : अरे देवा, बरं झाल माझा जन्म त्यापूर्वी नाही झाला.

वेगळं काही

झारखंडमधल्या बोकारो जिल्ह्यातल्या एका कुंडाचं रहस्य भूगर्भशास्त्रज्ञांनाही उलगडता आलेलं नाही. या कुंडाजवळ उभं राहून जोरात टाळ्या वाजवल्या की त्यातलं पाणी आपोआप वर येऊ लागतं, असं म्हणतात. एखाद्या भांड्यात उकळणाऱ्या पाण्यासारखं हे दृश्य असतं. दलाही कुंड या नावाने ते प्रसिद्ध आहे. हे कुंड सिमेंटच्या भिंतींनी वेढलं आहे. कुंडातलं पाणी उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात गरम असतं. हा विरोधाभास का, याचाही थांग कोणाला लावता आलेला नाही. या कुंडातल्या पाण्यामुळे चर्मरोग दूर होत असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. या पाण्यात गंधक आणि हिलियम वायू असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. दर संक्रांतीला इथे जत्रा भरते.

टेक केअर

## जिम आऊटफिट निवडताना...

जीमला जाताना किंवा वर्कआउट सेशनदरम्यान योग्य लॉन्जरी वापरणं आवश्यक असतं. त्यामुळे वर्कआउट सेशनदरम्यान आरामदायी वाटतं. व्यायाम करताना उत्साह वाटतो. म्हणूनच या मुद्द्याकडे सतर्कतेनं बघावं.

* वर्कआउट सेशनवेळी लायक्रा फॅब्रिकची ब्रा वापरावी. * मेडिटेशन दरम्यान फारशी मुव्हमेंट होत नसल्याने लाईट सपोर्ट देणारी ब्रा चालू शकते. * स्ट्रॉंग वर्कआउट करताना फुल सपोर्ट असणारी ब्रा वापरावी. * रोजच्या वर्कआउटसाठी योगा ब्रा ची निवड करावी. या ब्रा चं फॅब्रिक अत्यंत आरामदायी असतं. * कार्डिओ एक्सरसाईज करणाऱ्या महिलांनी हायपर क्लासिक पॅडेड स्पोर्टस ब्रा ची निवड करावी. या ब्रा मुळे संपूर्ण सपोर्ट मिळतो.* सुपरसॉफ्ट, सीमलेस, लाईटवेट आणि घाम शोषण्याची शक्ती असल्यामुळे हायपर स्टाईल डबलडेअर ब्रा चा वापर योग्य ठरतो. जॉगिंगसाठी ही ब्रा सर्वोत्तम आहे. * कोणत्याही वर्कआउटसाठी अंडर आर्मर स्पोर्टस ब्रा उपयुक्त ठरते. स्लिक, स्कीन फिट ब्रा वर्कआउट दरम्यान फुल सपोर्ट देते. * हाय कव्हरेज असणारी ब्रा कोणत्याही स्ट्रॉंग मुव्हमेंटसाठी सर्वोत्तम पर्याय आहे.



## सुडोकू १२७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ८ | | ५ | | | २ | ७ | ३ |
| ९ | | १ | ३ | | ४ | | | |
| | ७ | ६ | | ८ | | | | ५ |
| १ | २ | | | ४ | ८ | ६ | ५ | |
| | | ३ | ९ | | ५ | १ | ८ | ४ |
| ५ | | | | | १ | | | २ |
| ८ | | | | | ९ | ७ | ३ | ६ |
| | | ७ | ८ | | | ५ | | ९ |
| २ | ९ | | ७ | | | ४ | १ | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ X ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५ | २ | ६ | ४ | १ | ९ | ७ | ८ |
| ९ | ७ | ८ | ५ | ३ | २ | ४ | १ | ६ |
| ४ | ६ | १ | ९ | ८ | ७ | २ | ५ | ३ |
| ७ | ३ | ६ | २ | १ | ९ | ८ | ४ | ५ |
| २ | १ | ४ | ३ | ५ | ८ | ७ | ६ | ९ |
| ५ | ८ | ९ | ७ | ६ | ४ | ३ | २ | १ |
| ६ | ९ | ३ | ४ | ७ | ५ | १ | ८ | २ |
| ८ | ४ | ५ | १ | २ | ३ | ६ | ९ | ७ |
| १ | २ | ७ | ८ | ९ | ६ | ५ | ३ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक १२७

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | ■ | ७ | ८ | ९ | | १० |
| ११ | | ■ | १२ | | | | ■ | १३ | १४ | ■ | १५ | | ■ | |
| ■ | १६ | १७ | | ■ | | ■ | १८ | | | १९ | ■ | २० | | |
| २१ | ■ | | ■ | २२ | | | | | ■ | २३ | २४ | | ■ | |
| २५ | २६ | | २७ | ■ | | ■ | २८ | | २९ | ■ | | ■ | ३० | |
| ■ | | ■ | ३१ | | ■ | ३२ | ■ | ■ | ३३ | | | | | ■ |
| ३४ | | ३५ | | ■ | ३६ | | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ |
| | ■ | | ■ | ४० | | | ■ | | ■ | ४१ | | ४२ | ■ | |
| ४३ | | | | | | ■ | ४४ | | ४५ | | ■ | ४६ | ४७ | |
| | ■ | | ■ | | ■ | ४८ | | ■ | | ■ | ४९ | | | ■ |
| ■ | ५० | ■ | ५१ | | ५२ | | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | |
| ५६ | ■ | ५७ | | ■ | ५८ | | ■ | ५९ | ६० | | ■ | ६१ | | ■ |
| ६२ | ६३ | | | ६४ | | ■ | ६५ | ■ | | ■ | ६६ | ■ | ६७ | ६८ |
| ६९ | | ■ | ७० | | ■ | ७१ | | | | | | ७२ | ■ | |
| ■ | ७३ | | ■ | ७४ | | | | ■ | | ■ | ७५ | | | |

**आडवे शब्द :-**
१) दृष्ट लागू नये म्हणून लावावयाचा काळा ठिपका
४) कवी
७) म्हातारपण व मृत्यू नसलेला
११) ओळख, तमाशातील आख्यान
१२) चप्पल
१३) नेहमी
१५) अभिप्राय
१६) मसाल्यातील एक पान
१८) निरर्थक बडबड
२०) तपस्या
२२) म गांधीजींचे नाव
२३) सुसर
२५) पाणी उकळताना होणारा आवाज
२८) सापाची एक जात
३०) होडी
३१) पडसे
३३) दिलेले वचन मोडणे
३४) भीमाने मारलेला खादाड राक्षस
३६) दाखला, नमुना
३८) पृथ्वी
४०) पोट
४१) एक सुगंधी पूड
४३) सोनचाफा
४४) श्रीकृष्णाचे एक नाव
४६) चिंतन
४८) शपथ
४९) गव्हाचे पीठ
५०) गोमाता
५१) राजवाडा
५४) विशेष
५५) शरम
५७) माझा
५८) व्रत
५९) निमित्त
६१) नरमांजर
६२) इतरांहून वेगळा
६७) लक्ष्मीचे एक नाव
६९) शक्ती
७०) वृक्ष
७१) महिलांच्या पंजाबी पोषाखातील दोन वस्त्रे
७३) शरीर
७४) कोलकाताचे विमानतळ
७५) लोणी

**उभे शब्द :-**
१) ग्राम, खेडे, नगर
२) निकट
३) पत्र
४) लोकमान्य टिळकांनी लिहिलेला टीका ग्रंथ
५) निरुपयोगी गवत
६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
८) बस्तान
९) रात्रभर
१०) मांडणी करणारा
१४) कोर्टातील खटला
१७) वाघाची मावशी (सं )
१८) सुकामेव्यातील आणि खेळण्याच्या पत्त्यात असणारा एक खाद्य पदार्थ
१९) विषमच्या विरुद्ध
२१) अति उंचावरून फिरणारा पक्षी
२४) अतिशय उंच इमारत
२६) पृष्ठभागावरील निघालेला छोटासा तुकडा
२७) रेशमाचे जाडसर कापड
२९) ओळ, रांग
३०) बिनावासाचे पांढरे फूल
३२) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३४) वाईट कृत्य
३५) चंद्र
३६) पाणी
३७) दात
३९) चीजवस्तू
४०) मेहेरबानी
४१) कृमी, धान्यातील सरपटणारा छोटा जीव
४२) सुंदर तरुणी
४४) दावानल
४५) नारळाचे झाड
४७) नकला करणारा
४८) कधीही खोटे न दाखविणारी काच
४९) तत्वांश धातूची परीक्षा,
५१) च्या बरोबर
५२) कावकाव करणारा पक्षी
५३) दरोडा
५४) खनिजाचे घर
५६) दोन नद्यांच्या बेचक्यातील जमीन
५७) फळांचे शेत
६०) शुष्कता, भकभक
६३) पाझरणारा, ठिबकणारा
६४) पक्षांचा राजा, श्रीविष्णूचे वाहन
६५) लेखणी
६६) भुई, भूमी
६८) हत्तींचा गुरुजी
७१) खुंट, आंचळ, धस
७२) एक बारीक धान्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | ता | सा | ठी | म | णि | फो | ड | णे | ब | रो | ब | र | ना | ही |
| त | प | न | ■ | ल | ■ | क | र | ■ | र | ज | ■ | प | त | न |
| रा | ■ | क | सा | ई | ■ | ना | ■ | अं | क | ■ | ब | का | ल | ■ |
| म | न | ■ | ठ | ■ | को | ड | गा | ■ | त | र | स | ■ | ग | स्त |
| ■ | य | था | व | स | र | ■ | य | क्ष | ■ | मा | क | ड | ■ | व |
| ध | न | ■ | णू | ■ | डा | ल | न | ■ | अ | ना | र | क | ली | ■ |
| व | ■ | पं | क | ज | ■ | हा | ■ | वि | ज | य | ■ | वि | ■ | स |
| ■ | म | ध | ■ | व | स | न | वा | त | ■ | क | स | णे | ■ | ट |
| क | म | र | क | स | ■ | स | म | र | स | ■ | म | ■ | मो | र |
| न | ■ | व | ळ | ■ | स | हा | ■ | क | म | त | र | ता | ■ | फ |
| क | व | डा | ■ | अ | न | न | स | ■ | का | ळ | ■ | स | क | ट |
| ■ | खा | ■ | भा | ट | ■ | ■ | त | पे | ली | ■ | पा | ■ | द | र |
| फा | र | क | त | ■ | सं | प | र्क | ■ | न | क | ला | का | र | ■ |
| य | ■ | स | ■ | फा | सा | ■ | ता | क | ■ | ड | ■ | म | दा | र |
| दा | दा | बा | बा | क | र | णे | ■ | था | पे | बा | ज | ■ | न | स |

# अपहार करणाऱ्यांसाठी रामबाण उपाय हवा!




आपल्या सर्वांच्या आयुष्यात आपण 'राम' शोधतो आहोत. हतबल होऊन आता जीवनात राम उरला नाही असे बोलून आपली असमर्थता स्पष्ट करतो. 'राम जाणे असे बोलतांना आपण आपली अवलंबिता दाखवतो 'राम भरोसे' बोलून विश्वास स्पष्ट करतो एवढेच कशाला एकमेकाला भेटल्यावर 'राम राम' असे संबोधन सुद्धा करतो. देशाच्या राजकारणातला एक सर्वात मोठा कालावधी 'राम मंदिर' आणि 'राम' या भोवती गेलेला आहे. आज सुद्धा त्यातून सुटका नाही असेच म्हणावे लागेल.

राम नावाचा महिमा सगळीकडे आहे. समाजकारण राजकारण यांना रामाचा उदोउदो होतो आहे. खेद एवढाच व्यक्त करावा लागतो की श्रीरामाचे राज्य म्हणजे 'रामराज्य' कधीच येणार नाही याचे! रामाच्या नावाने अनेक कारणे जन्माला येतात त्याचे वेगवेगळ्या स्तरावर राजकारण सुद्धा होते आहे. सर्वसामान्य जनतेला मात्र याचा काही लाभ नाही. मुळातच जनता कधीच लाभार्थी असत नाही. जनतेच्या नावाखाली श्रीरामाच्या नावाने समाजकारण राजकारण करणारेच लाभार्थी होताना दिसत आहेत.

मंदिरात जाणारे भक्त वेगवेगळ्या विचाराने जातात, वेगवेगळ्या अपेक्षेने जातात याबाबत मराठी साहित्यात संतानी सुद्धा लिहून ठेवलेले आहे. या मंदिरात जाणाऱ्यांना दान देणग्या देण्याची एक विशिष्ट भावना असते. आपण जी कर्म करीत आहोत किंवा अगोदर केली आहेत याबाबतचा हिस्सा ही मंडळी देत असतात. कदाचित आपल्या सुकर्मात, कुर्मात आणि पापपुण्यात देवालाच साथीदार बनवतांना दिसतात तसे नसते तर मंदिरातल्या देणग्या दानपेट्या ओसंडून वाहिल्या नसत्या, समाजपयोगी संस्थांना देणग्यांचा दुष्काळ सहन करावा लागला नसता.

मंदिरातल्या दान, देणग्या, इत्यादींचा अपहार हा काही नवीन नाही. त्यासाठी नामांकित जाज्वल्य असलेले अनेक मंदिराची उदाहरणे देता येतील. आपल्यांवर परकीय आक्रमणांने अनेकवेळा शहरे लुटली गेली त्यापेक्षा जास्त मंदिरे लुटली गेली आहेत. भाविकांना या संदर्भात दु:ख व्हावे अशी स्थिती त्यामुळे दिसत नसावी. एकदा दान, देणगी दिल्यानंतर त्याचे काय झाले ही जबाबदारी भाविकांची नाही असाच सोयीस्कर अर्थ त्याबाबत भाविक मंडळी पण घेतात आणि त्यांचा अपहार, चोरी करणारे सुद्धा घेतात. येथे प्रश्न आहे तो श्रद्धेचा आणि आपल्या आराध्य देवतेवरील भक्तीचा. कोठेतरी चांगल्या गोष्टी होतील असा विश्वास जनतेला वाटायला लागतो तोपर्यंत त्यांच्या विश्वासाला तडा नाही तर भगदाडच पाडले जाते.

ऐतिहासिक राममंदिर त्याची उभारणी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना याबाबत देशातल्या जनतेचा एक विश्वास निर्माण झाला होता. लाखो लोक श्रीरामाचे दर्शन घ्यायला अयोध्येत नवनिर्मित मंदिरात गेले, अजून जात सुद्धा आहेत. भाविकांसाठी २०२४ मध्ये हे मंदिर खुले झाले पण न्यासाची स्थापना मात्र २०२० पासून झालेली आहे. श्रीराम मंदिरात देणग्या आणि मूल्यवान वस्तूंचा अपहार झाल्यानंतर उत्तरप्रदेश पोलिसांनी गुन्हेगारांना अटक केली. न्यासाच्या संस्थापक सरचिटणीसांनी राजीनामा दिला.

राजकारण / समाजकारण



डॉ.विलास ज. पवार

आता प्रश्न अजून चिघळलेला आहे. खरंतर ज्या सातत्याच्या प्रक्रियेतून ह्या मंदिराची उभारणी झाली आहे. हिंदु मुस्लिम संदर्भाची कडा सुद्धा या उभारणीला आहे. एक ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राष्ट्रीय सुद्धा प्रतिक ठरलेल्या श्रीराम मंदिराच्या न्यासाची दुर्दशा व्हायला नको होती. या मंदिराचे व्यवस्थापन भ्रष्टाचारात गुंतायला नको होते. राम मंदिराच्या उभारणी करतांना धर्मकार्य म्हणून समाजातल्या अनेक घरातल्या लोकांनी याला हातभार लावलेला आहे. जवळपास साडेतीन हजार कोटी रोख रक्कम जमा झाली होती. दागदागिने जडजवाहिर सुद्धा मोठ्या प्रमाणात जमा झाले. याबाबत जो काही अपहार झाला आहे याबाबत विरोधीमत मांडणारे, वाद घालणारे हिंदुत्ववादी संघटना हिंदूधर्म कार्याला वाहून घेणाऱ्या व्यक्ती इ. कडून होत आहे. देगण्यांचा अपहार याबाबत राजकारण असते तर राजकीय विरोधकांनी विरोध केला असता तर इथे राजकारण म्हणता आले असते परंतु यासाठी राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे मत व्यक्त करतात की अयोध्येतील राम मंदिराबाबत कोणी प्रश्नच निर्माण करता कामा नये त्यांच्या मते त्यामुळे धर्माचा अपमान होतो आणि या वक्तव्यामुळेच याचे राजकारण होते आहे.

देव मंदिर, अध्यात्म यांचा वापर समाजकारणाच्या ध्रुवीकरणांसाठी आजपर्यंत होत आला आहे. धार्मिक चढणघडणीसाठी यांत काही गैर नाही. मंदिराला दिलेल्या देणग्या दान हा भाविकांच्या आस्थेचा मुद्दा आहे, त्यांच्या धार्मिक श्रद्धेचा विषय आहे. त्यांच्या विश्वासांचा मुद्दा आहे तिथे राजकारण न करता अपहारात दोषी असणारे त्यांचे समर्थक यांना योग्यप्रकारे शिक्षा होणे गरजेचे आहे. कथित भ्रष्टाचारांबाबत देशातल्या केंद्रीय सत्तेने मौन सोडून कारवाई करणे गरजेचे आहे. हे नितांत आवश्यक आहे. याबाबत रामबाण उपायचाचीच अपेक्षा करायला हवी आहे. **

# देवभूमी हिमाचल

सफर
वर्षा कुवळेकर
८७६६५६९१३६

गुशैनी मधील मुक्काम संपला. मागे पुढे उभे असे ते पर्वत, प्लम, सफरचंद, अक्रोडाची झाडे, बहरलेले गुलाब, डेलीया यांचा निरोप घ्यायची वेळ आली. तीर्थन नदी, त्या पात्रात असलेली हॉटेल्स, रात्रीच्या अंधारात समोरच्या पर्वतावर चमकणारे अगणित हॉटेल्स म धील दिवे. दोन दिवस सवयीच्या झालेल्या या गोष्टी, कायमच्या मनात साठवून ठेवायच्या होत्या. त्या अवघड रस्त्याची आठवणही कायम राहणार आहे. आज परतताना त्या लाकडी आणि लोखंडी पुलावर उभे राहून नदीचा आनंद पुरेपूर घेतला. पात्रात असणाऱ्या धोंड्यांवर बसून खूप फोटो काढले आणि निघालो.

आज परत एकदा तीर्थन खोऱ्यातून निघून वेगळ्या वाटेने रामपूर बुशहर कडे जायचे होते. वाटेत जलोरी पास नावाची खिंड लागते. ही खिंड समुद्रसपाटीपासून ३१२० मीटर उंचीवर आहे. या खिंडीमुळे कुलू जिल्हा शिमला जिल्ह्याशी, आणि पुढे किन्नौर जिल्ह्याशी जोडला जातो.

जलोरी पास ही डोंगर माथ्यावरील खिंड सरलोसर लेक ट्रेक, रघुपूर फोर्ट ट्रेक, ३६० डिग्री पॉइंट ट्रेक आणि बजाह टॉप ट्रेक अशा अनेक ट्रेक्सचा बेस आहे. टुरिस्ट मंडळींचा आवडता स्टॉप असावा असे तिथली चहलपहल पाहून लक्षात आले. तरुणाई यातील ३६० डिग्री पॉइंट ट्रेक सारखे अवघड ट्रेक आनंदाने करते. आम्ही सरलोसर ट्रेक करायचे ठरवले हो-ते. कारण तो सर्वात सोपा मानला जातो. थोडा चढणीचा पण सरळ ५ किलोमीटर ट्रेक आहे तो. हा ट्रेक जिथे संपतो तिथे सरलोसर नावाचा छोटा पण सुंदर तलाव आहे, तलावाच्या काठावर बुढी नागिनचे मंदिर आहे. माहिती सविस्तर समजली होती. जाऊन येऊन दहा किलोमीटर चालायचे होते.

मनात खूप इच्छा होती पण आदल्या दिवशीचे दोन ट्रेक जरासे जास्तीचा डोस झाले होते. त्यामुळे एक किलोमीटर सुद्धा पूर्ण व्हायच्या आधीच मी थांबायचे ठरवले. जंगलातील अरुंद पायवाटेवरील चालणे नक्कीच सुखावह होते. पण मी त्या निसर्गात बसून एन्जॉय करायचे ठरवले. मी हे जाहीर करताच प्रविणा आणि शर्मिला दोघींनी मला साथ देण्याचे ठरवले. छान सावली बघून, झाडाला पाठी टेकून आमचा गप्पांचा फड रंगला. आमच्या समोर छोटे टेकाड होते. त्यावर ट्रेकर्स साठी उपलब्ध असलेले घोडे चरत होते. दुसऱ्या बाजूला सुरूच्या झाडांचा उतार होता. खाली खाली सावली आणखी घनदाट होती. तिथे जाऊन बसायचा मोह होत होता. पण आधी उतरून परत चढायचा विचार सुद्धा करायची तयारी नव्हती. पाण्याच्या बाटल्या आणि गोळ्याबिळ्या होत्याच जवळ. मंद वाऱ्यावर मजेत बसलो.



बाकी मंडळींनी पुढे जायचे ठरवले तसे गेले आम्हाला काळजी घ्या वगैरे सांगून. मात्र दीड एक किलोमीटरपर्यंत जाऊन तेही सगळे तिथे झाडात बसले. मेडिटेशन केलं थोडावेळ, मग गप्पा मारून आले परत.

आधी म्हटले तसे पर्यटक प्रेमाचे ठिकाण असल्याने इथली स्थानिक विक्रेते मंडळी आपापली दुकाने मांडून वाटच पाहत होती. स्वतः विणलेल्या शाली, मफलर, टोप्या, स्वेटर्स खूप खूप गोष्टी खुणावत होत्या. आम्हीही त्यात बुडून गेलो. तिथे नैसर्गिक थंड पाण्याच्या बाटल्या विकणारे होते आणि प्लम, पीच सारखी ताजी ताजी फळेही विकणारे होते. काय अप्रतिम गोडी होती त्या फळांची. शब्दात पकडणेच कठीण. गाडीत सुद्धा सारखे लागायचे खायला त्यामुळे खूप खरेदी केली. या फळांनी अपार आनंद दिला आम्हाला.



त्यानंतर आम्ही रामपूर बुशहर या बुशहर साम्राज्याच्या आधीच्या राजधानीच्या शहराला भेट देणार होतो. हिमाचल प्रदेशाची सद्यकालीन उन्हाळ्यात शिमला आणि हिवाळ्यात धरमशाला आहे. सतलज नदीच्या डाव्या किनाऱ्यावर वसलेली ही पुरातन राजधानी हवामान वर्षभर सहनीय असल्यामुळे मुख्य शहर म्हणून निवडले गेले असावे. तसे व्यापारी बाजारपेठ म्हणून सर्वात कनेक्टिव्हिटी असलेले हे शहर होते. आत्तापर्यंत पाहिलेल्या गावांपेक्षा बऱ्यापैकी मोठे शहर आहे हे. इथला राजवाडा पहायचा होता. आमच्या टेम्पो ट्रॅव्हलर मधून उतरून राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत गेलो आणि हवामान बदलले.

आत गेलो पण राजवाड्याची द्वारे पर्यटकांसाठी बंद होती. एक इमारत आता भव्य हॉटेल मध्ये रूपांतरित झाली असून तिथेही आत जाता आले नाही. बाहेरून कलाकुसर पाहत होतो. वीरभद्र सिंह यांचे वडील महाराज पद्म सिंह यांनी १९१९ मध्ये हा राजवाडा बांधला. वीरभद्र सिंह हिमाचलचे सहा वेळा मुख्यमंत्री होते, ते अधूनमधून इथे येतात. अशी माहिती समजली. कोणीही स्टाफ ड्यूटीवर नसल्याने पावसाची साद येऊ लागल्याने निघालो घाईने तर त्या भव्य प्रांगणात थेंबाचे नृत्य सुरू झाले, जोडीला वाऱ्याची साथ. काही क्षणात एक अलौकिक दृश्य समोर साकारले. एक विस्तीर्ण पिंपळ वृक्ष वाटेतच होता. वाऱ्या पावसाच्या आगमनाने तो असा काही पानोपानी सळसळला की आम्ही बघतच राहिलो. वावटळ उठावी तशी एकुणएक पान वरच्या दिशेने उधळल्यासारखे झाले. गदगदून झाड आख्खे हलू लागले. माझे शब्द संपले बाई. ते आमच्या प्रवीणाने कॅमेरात अप्रतिम बंदिस्त केले. भानावर येऊन थेंब चुकवत राजवाड्यासमोर असणाऱ्या दुकानात शेड खाली आसरा घेतला. बागेसाठी लागणाऱ्या औषधी फवारे मिळणारे दुकान. मोठे मोठे कॅन्स होते तिथे. त्यांनी भरपूर आमच्या ज्ञानात भर घातली. सफरचंदे, आलू बुखार, प्लम फळांना सीझनमध्ये नियमित फवारणी लागते. त्याचे मुख्य दुकान होते. फुले आणि फळे, भाज्यांचे बियाणे ही होते. मला यात उत्सुकता होती. पण दुकानदार भला माणूस होता. ''यातील काहीही तुम्हाला घेऊन जाणे शक्य नाही, एकतर विमानतळावर फेकून देतील, दुसरे तुमच्याकडे काहीच उगवणार नाही. हवा आणि मातीमुळे आणि तिसरे या विशिष्ट औषधांच्या फवारणी शिवाय या बागांना गत्यंतर नाही.'' इति दुकानदार.

माणूस गप्पिष्ट होता. आग्रहाने, ''आप बैठिये, खडे क्यूँ हो?'' म्हणून बसवले सुद्धा. राजवाडा बघायला मि ळाला नाही सांगितले तेव्हा, ''ये ना बदमाष गार्डस्, ऐसेही करते हैं. कोई देखने वाला नहीं तो फायदा उठाते हैं.'' असेही म्हणाला. गावातील प्रतिष्ठित माणूस वाटला. आले गेलेले थांबून प्रणाम करत होते. त्यानिमित्ताने माझे जरा स्थानिकांचे अवलोकन पार पडले.

तिथून लंच साठी रिकाँग पिओ गावात गेलो. हेही बऱ्यापैकी मोठे गाव. इथून पुढे आम्ही आणखी उंचावर जाणार होतो. इथेच जवळच्या स्वेटर्सनी हात वर केल्याने ती खरेदी आणि डोक्याला लोकरीचे स्कार्फ गरजेचे झाले. मला उत्तम हवे तसे स्वेटर मिळाले. कोणी रेनकोट, हँड ग्लोव्हज अशा महत्त्वाच्या गरजेची खरेदी या गावात केली. या हॉटेलमध्ये पहिल्यांदा आलो त्यामुळे त्यांचा होता तो मेन्यू स्वीकारला. चव छानच असते फक्त वैविध्य कमी. इथले डाळींचे प्रकार तर लाजवाब! याच गावातून सर्वात प्रथम हिमशिखरांनी दर्शन दिले. खुळावलो आणि रस्त्यावरील विजेच्या खांबावरील तारांच्या भेंडोळ्यांमधून फोटो घेण्याच्या मागे लागलो. आमच्या हाती काय खजिना लागणार आहे याबाबत खरोखर अनभिज्ञ होतो. **

# प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र : गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मूल्यमापनाचे आत्मपरीक्षण




सुनील गवळी

''परिवर्तन हा प्रगतीचा आत्मा आहे. जे शिक्षण काळानुसार बदलते, तेच समाजाला भविष्याकडे घेऊन जाते.''

महाराष्ट्र ही शिक्षण क्षेत्रात देशाला दिशा देणारी भूमी आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनविले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे दरवाजे वंचितांसाठी खुले केले, राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणातील समतेचा पाया मजबूत केला आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'' हा अमर संदेश दिला. या महान परंपरेचा वारसा जपत महाराष्ट्र आज ''प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र'' घडविण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षणाची नवी दिशा स्पष्ट केली आहे. पाठांतरावर आधारित शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचारशक्तीचा विकास, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता, संवादकौशल्य, डिजिटल साक्षरता, मूल्यशिक्षण आणि जीवनकौशल्यांचा विकास हे त्याचे केंद्रबिंदू आहेत. ही दिशा केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित नसून मूल्यमापनाच्या पद्धतीतही आवश्यक बदल अपेक्षित करते.

याच पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणातील उत्तीर्णतेच्या निकषांबाबत कालानुरूप आत्मपरीक्षण होणे आवश्यक वाटते. अनेक वर्षांपासून प्रचलित असलेले निकष त्या त्या काळातील गरजांनुसार निश्चित झाले. भारतीय शिक्षणव्यवस्थेत अनेक दशकांपासून ३३ किंवा ३५ टक्के गुण मिळाल्यास विद्यार्थी उत्तीर्ण मानला जातो. हा निकष इतका रूढ झाला आहे की त्यामागील उद्देश, उपयुक्तता आणि आजच्या काळातील सुसंगतता याबद्दल फारशी चर्चा होत नाही. परंतु जग झपाट्याने बदलत असताना शिक्षणव्यवस्थेनेही स्वतःचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. परंतु शिक्षणव्यवस्था सातत्याने विकसित होत असल्याने प्रत्येक धोरणाचा वेळोवेळी अभ्यास होणे हीच प्रगतीची ओळख आहे.

येथे उद्देश कोणत्याही विद्यमान व्यवस्थेवर टीका करणे नाही. उलट, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र शासनाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या ध्येयाला अधिक बळकटी कशी देता येईल, हा आहे.

आजचा विद्यार्थी उद्याचा वैज्ञानिक, शिक्षक, शेतकरी, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी असू शकतो. त्यामुळे त्याचे मूल्यमापन केवळ लेखी परीक्षेतील गुणांवर मर्यादित न राहता त्याच्या प्रत्यक्ष आकलनावर, कौशल्यांवर, मूल्यांवर आणि जीवनातील उपयोजनक्षमतेवर आधारित असणे आवश्यक आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या दिशेने पुढे जाताना पुढील बाबींवर व्यापक विचारमंथन होऊ शकते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत कौशल्याधारित मूल्यमापन अधिक सक्षम करणे.

विद्यार्थ्यांच्या संकल्पनात्मक आकलनाला अधिक महत्त्व देणे.

सातत्यपूर्ण आणि सर्वांगीण मूल्यमापन अधिक परिणामकारक करणे.

शिक्षकांना आधुनिक मूल्यमापनासाठी सातत्याने प्रशिक्षण देणे.

शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या सहभागातून मूल्यमापन प्रणालीचे वेळोवेळी पुनरावलोकन करणे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवणारी प्रगतीपत्रिका अधिक प्रभावी करणे.

प्रगत महाराष्ट्राची ओळख केवळ आधुनिक तंत्रज्ञानाने होणार नाही; तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुप्त क्षमतेवर विश्वास ठेवणाऱ्या शिक्षणव्यवस्थेमुळे होईल. शिक्षणात गुणवत्ता, समता आणि संवेदनशीलता यांचा समतोल राखत सातत्याने सुधारणा करणे हीच खरी प्रगती आहे. म्हणूनच आज गरज आहे ती कोणत्याही वादाची नाही, तर विधायक संवादाची; कोणत्याही दोषारोपाची नाही, तर संशोधनाधारित आत्मपरीक्षणाची; कोणत्याही संघर्षाची नाही, तर सहकार्याने शैक्षणिक परिवर्तन घडविण्याची.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आत्मा, 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र'चे स्वप्न आणि प्रत्येक बालकाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार या तिन्हींचा समन्वय साधण्यातच आपल्या शिक्षणव्यवस्थेचे उज्ज्वल भविष्य दडलेले आहे.

चला, गुणांच्या पलिकडे जाऊन गुणवत्तेचा विचार करूया; परीक्षेच्या पलिकडे जाऊन शिक्षणाचा विचार करूया; आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडवूया. **

# सर्वसामान्य लोकांच्या राजकारण्याकडून अपेक्षा

**निलेश साठे**

लोकशाहीमध्ये जनता हीच खरी मालक असते आणि राजकारणी हा तिचा प्रतिनिधी. प्रत्येक निवडणुकीत जनता मोठ्या विश्वासाने आपल्या प्रतिनिधीची निवड करते. मात्र निवडणूक संपल्यानंतर अनेकदा जनतेच्या अपेक्षांवर पाणी फिरते. त्यामुळे आज प्रश्न निर्माण होतो की, सर्वसामान्य नागरिकांच्या राजकारण्यांकडून नेमक्या काय अपेक्षा आहेत?सर्वसामान्य नागरिकाला मोठमोठी आश्वासने नकोत; त्याला आपल्या दैनंदिन जीवनातील समस्या सुटाव्यात अशी अपेक्षा आहे. चांगले रस्ते, नियमित पाणीपुरवठा, अखंड वीज,



दर्जेदार शिक्षण, सुलभ आरोग्य सेवा, रोजगाराच्या संधी आणि सुरक्षित वातावरण या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे कोणत्याही लोकप्रतिनिधीचे पहिले कर्तव्य असले पाहिजे. आजही अनेक लोकप्रतिनिधी निवडणुकीपूर्वी नागरिकांच्या दारात दिसतात; मात्र निवडून आल्यानंतर त्यांचा जनतेशी संपर्क कमी होतो. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधींनी नियमितपणे नागरिकांच्या भेटी घ्याव्यात, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत.

भ्रष्टाचार हा विकासाचा सर्वात मोठा शत्रू आहे. जनतेच्या पैशाचा प्रत्येक रुपया योग्य कामासाठी खर्च झाला पाहिजे. सरकारी योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत कोणत्याही दलालीशिवाय पोहोचला पाहिजे. पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे.

राजकारण हे समाजाला जोडण्यासाठी असते, तोडण्यासाठी नाही. जात, धर्म, भाषा किंवा पक्षीय मतभेदांच्या पलिकडे जाऊन सर्व नागरिकांना समान न्याय आणि समान संधी देणारे नेतृत्वच समाजाचा खरा विकास घडवू शकते.आजचा मतदार जागरूक आहे. तो प्रश्न विचारतो, हिशेब मागतो आणि काम करणाऱ्या प्रतिनिधीलाच पुन्हा संधी देण्याचा विचार करतो. त्यामुळे राजकारण्यांनी प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कामावर भर दिला पाहिजे.लोकशाहीची खरी ताकद जनतेच्या विश्वासात असते. हा विश्वास टिकवण्यासाठी राजकारण्यांनी सत्तेचा वापर अधिकार म्हणून नव्हे, तर सेवाभावाने करणे आवश्यक आहे. कारण जनतेला शब्दांपेक्षा कामावर विश्वास आहे. ज्या दिवशी प्रत्येक लोकप्रतिनिधी जनतेच्या अपेक्षांना न्याय देईल, त्या दिवशी देशाच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि लोकशाही अधिक बळकट होईल. ●

# वाचनीय आणि प्रेरक


# -: कहाळेकर विशेषांक :-

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद येथील 'पंचधारा'ने "कहाळेकर विशेषांक" प्रकाशित केला आहे. सुरुवातीला प्रमुख संपादक डॉ. विद्या देवधर यांनी या विशेषांकाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. कहाळेकरांच्या कामाच्या, व्यासंगाच्या आणि धाकाच्याही आठवणी सांगताना, त्यांच्या कार्याबद्दल नितांत आदर या लेखांमधून व्यक्त झाला आहे. मराठवाड्यातील आधुनिक मराठी साहित्याचा पाया रचण्यामध्ये भा.शं. कहाळेकर यांनी अतोनात कष्ट घेतले होते. १९५८ मध्ये 'मराठी साहित्य परिषदे'ची स्थापना करण्यात कहाळेकर यांचा सिंहाचा वाटा होता, याचाही डॉ. विद्या देवधर यांनी विशेष उल्लेख केला आहे. विशेषांकाचे रंगीत मुखपृष्ठ वेधक आणि माहितीपूर्ण आहे.

सुरुवातीच्या, "श्रद्धांजली-पन्नालाल सुराणा" या डॉ.नयना जोशी-देशपांडे यांच्या लेखातून, ९३ व्या वर्षी निधन पावलेल्या, पन्नालालजींच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले गेले आहेत. पन्नालाल सुराणा (९.७.१९३३ - ३.१२.२०२५) यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यात,आसू या गावी एका मारवाडी जैन कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण बार्शी येथील नगरपालिकेच्या शाळेत झाले त्यांना अनेक उत्तम शिक्षक लाभले. १९४२-४३ मध्ये पन्नालाल सुराणा तथा भाऊ सेवादलात जात असत. राष्ट्रवादाच्या संस्कारामुळे समाजवादाशी यांचे घट्ट नाते जुळले. जातिभेद निर्मूलन, सामाजिक समानता, अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे, हे भाऊंच्या मनावर बिंबले आणि ते समाजवादाशी आयुष्यभर निष्ठावान राहिले. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात, त्या काळात देशव्यापी आंदोलने झाली, त्यामध्ये ते सहभागी झाले. वयाची नव्वदी उलटली तरी देशासाठी आणि समाजकार्यासाठी एखाद्या तरुणाला लाजवेल अशा उत्साहात ते कार्यरत होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील त्यांच्या विविध कार्यांचा आढावा या लेखात सविस्तरपणे घेण्यात आला आहे. १९९३ मधील किल्लारीतील भूकंपग्रस्त कुटुंबातील शेकडो मुले अनाथ बेघर झाली. त्यांच्यासाठी त्यांनी "आपलं घर" हा निवासी प्रकल्प उभारला. त्यामुळे आजपर्यंत हजारो अनाथ मुलांना तेथे मायेची ऊब मिळाली. आयुष्यभर त्यांनी एसटी बसने आणि रेल्वेने प्रवास केला. पहाटे उठून ते रोज किमान पन्नास पोस्टकार्ड लिहीत असत. त्यातून त्यांचा देशभर संपर्क सुरू होता. विविध कामांच्या व्यापात असूनही पन्नालाल सुराणा यांनी तब्बल ६९ पुस्तके लिहिली. विश्वनाथ प्रताप सिंह हे पंतप्रधान असताना, त्यांनी पन्नालाल यांना राज्यपाल होण्यासाठी पत्र पाठवले.

"मला सर्वसामान्य माणसांत काम करायचं आहे... तेव्हा मला राजभवनाच्या शिष्टाचाराच्या बंधनात अडकवू नका." असे नम्रपणे सांगत त्यांनी राज्यपालपद नाकारले. स्वच्छ चारित्र्य, तपस्वी जीवन जगणारे पण विचारांची धारदार तलवार घेऊन




समाजासाठी लढत राहणारे, असे पन्नालाल सुराणा यांचे दुर्मिळ व्यक्तिमत्त्व होते. डॉ. वृंदा देशपांडे-जोशी यांनी योगी अरविंद यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती आपल्या लेखाद्वारे करून दिली आहे. पडुचेरी येथील त्यांच्या आश्रमात आता कोणते कार्य केले जाते,याचीही माहिती या लेखाद्वारे होते. मुस्लीम सत्यशोधक आणि समाज प्रबोधन' हा डॉ.बेनझीर तांबोळी यांचा लेख विचारप्रवर्तक आहे. हमीद दलवाई यांचे प्रगतिशील धर्मनिरपेक्ष आणि मानवताभिमुख विचार हेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे अधिष्ठान आहे. धर्मनिरपेक्षतेचा प्रचार, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे आणि समाजाला कालसुसंगत बनवणे, हा मंडळाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. पारंपरिक, कालबाह्य शरीयताधारित कौटुंबिक कायद्यांच्या जागी समान नागरी कायद्याचा आग्रह करण्यामागेही हीच भूमिका आहे. 'भालचंद्र महाराज कहाळेकर-काही आठवणी' हा प्रा. न.गो.राजूरकर यांचा लेख, कहाळेकर यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची माहिती देतो. नरहर कुरुंदकर भालचंद्र महाराज कहाळेकरांचा उल्लेख 'मराठवाड्यातील कुतुबमिनार' असा करीत असत. कहाळेकरांना आव्हान स्वीकारायची आवड होती आणि अशा परिस्थितीत ते लढाऊ वृत्तीने आपले विचार प्रकट करत. मधु जामकर यांनी त्यांच्या काही आठवणी सांगितल्या आहेत.

प्रा.कहाळेकर 'महाराज' या नावाने ओळखले जात. परंतु त्यांच्या 'महाराज' नावाचा धर्म परंपरेशी संबंध नव्हता. आधुनिकतावादी विद्यापीठाचे ते महाराज होते. मोठे प्रकांड पंडित आणि पुरोगामी विचारवंत होते. त्यांचे वडील परभणीला स्थायिक होते. भालचंद्र महाराज हे त्यांचे ज्येष्ठ पुत्र. महाराज एम.ए. एल.एल.बी. होते. संस्कृत, मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. तेलगू, कानडीही ते जाणत होते.१९५० साली मराठीचे प्राध्यापक म्हणून ते हैदराबादला आले. तेथील २५ वर्षांत, हैदराबादला त्यांनी मराठी अध्यापन, मराठी ग्रंथसंग्रहालय, मराठवाडा साहित्य परिषद यासाठी बहुमोल कार्य केले. मधु जामकर हे त्यांचे जवळचे विद्यार्थी होते. विद्यार्थी असताना मधु जामकर यांना, महाराजांनी वेळोवेळी आर्थिक मदत केली, मानसिक आधारही दिला होता. प्रतिभा जोशी, मीना मनसबगार, प्रभा नान्नजकर यांनी, विद्यार्थी दशेतील, आपल्या त्यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. प्रा.कहाळेकर यांच्या शिकवण्याविषयी त्यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. १९७५ साली कहाळेकर पंचधारा विशेषांक प्रकाशित झाला होता. त्यामधील काही लेख, या विशेषांकात समाविष्ट केले आहेत. प्रा.नरहर कुरुंदकर, यशवंत कानिटकर, प्रा. सुरेंद्र बारलिंगे यांचे सविस्तर लेख विलक्षण वाचनीय आहेत. 'जी. ए. कुलकर्णी यांची लघुकथा-काही विशेष' हा भा.शं.कहाळेकर यांचा अभ्यासपूर्ण लेखही समाविष्ट करण्यात आला आहे. चिन्मय रहाळकर,अमोल कवडे यांची ग्रंथ परीक्षणे उत्तम झाली आहेत. 'कार्यवृत्त' सदरातील माहितीद्वारे, मराठी साहित्य परिषदेच्या विविध साहित्यिक कार्याची सविस्तर माहिती मिळते. त्यासंबंधीची रंगीत छायाचित्रेही अंकात समाविष्ट आहेत.

भालचंद्र महाराज कहाळेकर हा 'पंचधारा'ने प्रकाशित केलेला विशेषांक विलक्षण वाचनीय आणि संग्राह्य झाला आहे. प्रा.कहाळेकरांच्या समकालीन लेखकांच्या नजरेतून आणि त्यांच्या माजी विद्यार्थ्यांच्या नजरेतून, असा दोन पिढ्यांमधील तुलनात्मक दृष्टिकोन दर्शविणे हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. "पंचधारा" मार्फत, हैदराबादमधील मराठी साहित्य परिषदेने, मराठी भाषा आणि साहित्य यांचा प्रसार करण्याचे कार्य, दीर्घकाळ, महाराष्ट्राबाहेर असूनही सातत्याने, उत्तम प्रकारे चालविले आहे. याबद्दल संस्थेचे आणि सर्व कार्यकर्त्यांचे विशेष हार्दिक अभिनंदन! ●

# 'मानवतेच्या विवेकाला जागवणारी वेदना'



**श्री. धनंजय शेटये**

दि. १८ जून २०२६ रोजी राजस्थानातील श्रीगंगानगर येथे घडल्याचे वृत्त समोर आलेली एक अमानुष घटना संपूर्ण समाजमनाला हादरवून गेली. एका निष्पाप, अल्पवयीन मुलीवर झालेल्या क्रूर अत्याचाराची बातमी वाचताना शब्दच हरवून जातात. अशा घटना केवळ एका कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करत नाहीत, तर संपूर्ण समाजाच्या विवेकाला, संस्कृतीला आणि मानवतेलाच काळिमा फासतात. अशा प्रसंगी मन संतापाने पेटून उठते, डोळ्यांत अश्रू दाटतात आणि एकच प्रश्न अस्वस्थ करतो माणूस इतका निर्दयी कसा होऊ शकतो?

ज्या स्त्रीच्या उदरातून प्रत्येक जीव या पृथ्वीवर जन्म घेतो, जिच्या मायेच्या कुशीतून संस्कारांची पहिली पालवी फुटते, त्या स्त्रीत्वावरच अत्याचार करण्याइतकी विकृत मानसिकता समाजात कशी निर्माण झाली? आई, बहीण, मुलगी, पत्नी अशा पवित्र नात्यांचा क्षणभरही विचार न करणारी ही राक्षसी वृत्ती केवळ एका व्यक्तीची चूक नसून समाजातील मूल्यांच्या ऱ्हासाची गंभीर चेतावणी आहे. स्त्रीचा सन्मान ही भारतीय संस्कृतीची ओळख मानली जाते; परंतु जेव्हा स्त्रीच असुरक्षित वाटू लागते, तेव्हा सभ्य समाजाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. अशा घटनांनंतर जनमानसात तीव्र संताप उसळणे स्वाभाविक आहे. कठोरात कठोर शिक्षा व्हावी, गुन्हेगारांना कायद्याने अत्यंत कठोर दंड मिळावा, अशी भावना अनेकांच्या मनात निर्माण होते. मात्र न्यायव्यवस्था ही संविधान, कायदे आणि मानवी हक्कांच्या चौकटीत काम करते. त्यामुळे संतापाचे रूपांतर सूडात नव्हे, तर न्याय, कायद्याचा आदर आणि समाजपरिवर्तनाच्या सामूहिक प्रयत्नांत झाले पाहिजे. गुन्हेगारांना निश्चितच कठोर शिक्षा व्हावी; पण त्याचबरोबर अशा गुन्ह्यांना जन्म देणारी मानसिकता नष्ट करण्यासाठीही समाजाने एकजुटीने उभे राहणे आवश्यक आहे.

आज समाजात वाढत चाललेली गुन्हेगारी, स्वार्थ, व्यसनाधीनता, वासनेचे अंधानुकरण आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे माणुसकीच जणू कोमेजून चालली आहे. पैशाचा मोह, क्षणिक सुखाची लालसा आणि विवेकशून्य जीवनपद्धती यामुळे अनेक निष्पाप जीव अन्यायाचे बळी ठरत आहेत. अशा वेळी भारतीय संस्कृतीतील धर्मग्रंथांचे संदेश आपल्याला आत्मपरीक्षणाची संधी देतात.

श्रीमद्भागवत महापुराणात राजा परीक्षित आणि कलियुगाचा प्रसंग अत्यंत अर्थपूर्ण आहे. द्वापारयुग संपून कलियुगाचा प्रारंभ झाल्यावर राजा परीक्षिताने कलियुगाला राहण्यासाठी चार प्रमुख स्थाने दिली. त्या संदर्भात म्हटले आहे

**"द्यूतंपानंस्त्रियःसूनायत्राधर्मश्चतुर्विधः।"**

या एका श्लोकात समाजाच्या अधःपतनाची चार प्रमुख कारणे अधोरेखित केली आहेत.

पहिले स्थान म्हणजे द्यूतजुगार आणि फसवणूक. जिथे प्रामाणिक श्रमाऐवजी कपटाने धन मिळवण्याचा प्रयत्न होतो, तिथे सत्याचा लोप होतो आणि असत्याचे साम्राज्य निर्माण होते.

दुसरे स्थान म्हणजे मद्यपान आणि मादक पदार्थांचे सेवन. नशा माणसाचा विवेक हिरावून घेते. योग्य-अयोग्य यातील भेद नाहीसा होतो आणि अहंकार, उन्मत्तपणा व हिंसक प्रवृत्ती वाढीस लागतात.

तिसरे स्थान म्हणजे व्यभिचार आणि अनैतिक कामवासना. जेथे स्त्री-पुरुष संबंधांचा पाया प्रेम, सन्मान आणि जबाबदारी नसून केवळ वासना असते, तेथे पावित्र्य नष्ट होते आणि मानवी मूल्यांची गळचेपी सुरू होते. चौथे स्थान म्हणजे प्राणीहिंसा आणि क्रूरता. जिथे निरपराध जीवांवर अत्याचार होतो, तेथे दया, करुणा आणि संवेदना नष्ट होऊन क्रोध, निर्दयता आणि हिंसा माणसाच्या स्वभावाचा भाग बनतात. यानंतर कलियुगाने आणखी एका स्थानाची मागणी केली. तेव्हा राजा परीक्षिताने त्याला सुवर्ण म्हणजे अधर्माने, फसवणुकीने किंवा दुसऱ्याचा हक्क हिरावून मिळवलेल्या संपत्तीमध्ये वास करण्याची परवानगी दिली. अन्यायाने मिळवलेल्या संपत्तीतून लोभ, भ्रष्टाचार, अहंकार आणि अधःपतन वाढते, हा या प्रसंगामागील गूढ संदेश आहे.

आज या शिकवणीचा अर्थ अधिक प्रकर्षाने जाणवतो. गुन्हेगारी केवळ कायद्याने संपत नाही; ती संपते संस्कारांनी, शिक्षणाने, कुटुंबव्यवस्थेने, नैतिक मूल्यांनी आणि समाजाच्या सजग सहभागाने. मुलांना बालपणापासून स्त्रीचा सन्मान, संयम, सहानुभूती आणि जबाबदारीचे संस्कार दिले गेले, तर उद्याचा समाज अधिक सुरक्षित आणि संवेदनशील घडेल.

पुण्यकर्म माणसाच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्याची फुले उमलवते. म्हणून हा अमूल्य मानवी जन्म स्वार्थ, अहंकार आणि वासनांच्या अंधारात वाया घालवू नये. आपल्या हातून एखाद्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसले गेले, एखाद्या निराधाराला आधार मिळाला, एखाद्या मुलीला सुरक्षिततेची भावना मिळाली, तर तेच खरे जीवनाचे सार्थक ठरेल.

आज गरज आहे ती केवळ कठोर कायद्यांची नाही, तर कठोर आत्मपरीक्षणाची. न्यायव्यवस्थेबरोबरच समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, शाळा, शिक्षक, पालक आणि प्रत्येक नागरिकाने मानवतेचा दीप प्रज्वलित ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारण माणुसकी जिवंत असेल, तरच न्याय जिवंत राहील; संस्कार जिवंत असतील, तरच समाज सुरक्षित राहील.

चला, सूडाच्या ज्वालेपेक्षा संस्कारांचा दीप प्रज्वलित करूया. स्त्रीचा सन्मान, मानवतेचे रक्षण आणि पुण्यमार्गाचे आचरण हेच खऱ्या अर्थाने कलियुगावर विजय मिळवण्याचे सामर्थ्य आहे. राजस्थानमधील श्रीगंगानगर मधील एक अमानुष घटना. ●

# शहरातील वाढती लोकसंख्या आणि पर्यावरणाचा असमतोल!

**जगन घाणेकर**

**लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत.**

नुकताच जागतिक लोकसंख्या दिन संपन्न झाला. तुलनात्मक दृष्ट्या आकाराने लहान असूनही भारताने बलाढ्य चीनला मागे टाकून तीन वर्षांपूर्वी लोकसंख्येमध्ये पहिला क्रमांक पटकावला. आर्थिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशांमध्ये भारत सर्वात आघाडीवर आहे, मात्र वाढत्या लोकसंख्येच्या आधारावर जर देश महासत्ता होऊ पाहत असेल तर ती येणाऱ्या संकटाची नांदी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशाने अनुभवला. यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत ऋतुचक्रात होणारी असंतुलितता माणसाच्या आरोग्यावर परिणाम करत आहे. पर्यावरणाचा समतोल ढळतो आहे आणि या सर्वाला कारणीभूत आपणच आहोत. आजमितीला देशात अनियंत्रितपणे वाढणाऱ्या लोकसंख्येवर कोणताच अंकुश नाही. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. यंदा या संकटाचा सामना शहरवासीयांनी केला आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे येणाऱ्या काळात हे संकट अधिक भयावह होणार आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत.



लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत. शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. शहरांतील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे. रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. दिवाळीच्या दरम्यान दिल्ली, मुंबईसह अनेक शहरांतील हवेची गुणवत्ता कमालीची घसरून वातावरणातील विषारी धूलिकणांचे प्रमाण वाढले होते. त्यावेळी सर्वच ठिकाणचे खोदकाम आणि इमारतीच्या बांधकामांवर बंधने आणली होती. ही सर्व कामे आता पुन्हा सुरु झाली आहेत, त्यामुळे शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसन विकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, तर दुसरीकडे पर्यावरण वाचवण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. पर्यावरणाचे महत्व शाळा महाविद्यालयांत शिकवले जाते; मात्र ते जपण्यासाठी शहरसारख्या ठिकाणी कोणतीही अनुकूलता दिसून येत नाही. लोकसंख्या वाढत जात आहे आणि वाढत्या लोकसंख्येच्या सुविधेसाठी विकासकामे जोर धरू लागली आहेत. या सर्वांमध्ये पर्यावरणाची मात्र अपरिमित होनी होत आहे. ●

## निवडक




### महापालिकेचा बेजबाबदार कारभार उघड

**खांदा कॉलनी :** पावसाळा सुरू होताच पनवेल महानगरपालिकेच्या निष्काळजी कारभाराचे आणखी एक धक्कादायक उदाहरण समोर आले आहे. शहरातील श्री वीरूपाक्ष महादेव मंदिरासमोरील मुख्य रस्त्यावर महापालिकेने खोदून ठेवलेल्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्याने एक चारचाकी कार अडकून अपघाताची घटना घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी महापालिकेकडून रस्ता खोदण्याचे काम करण्यात आले होते. मात्र, कामानंतर तेथे कोणतेही बॅरिकेड्स, धोक्याचा इशारा देणारे सूचना फलक किंवा रात्री दिसतील अशी परावर्तित चिन्हे लावण्यात आली नव्हती. मुसळधार पावसामुळे खड्डा पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने वाहनचालकांना त्याचा अंदाज आला नाही. दुपारच्या सुमारास या मार्गावरून जाणारी राखाडी रंगाची कार पाण्याखाली दडलेल्या खड्ड्यात अडकली. कारचे पुढील चाक खोल खड्ड्यात रुतल्याने वाहन एका बाजूला झुकले. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत अथक प्रयत्नांनंतर कार सुरक्षित बाहेर काढली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी महापालिकेच्या हलगर्जीपणावरतीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

### उन्हाळ्यातील कामे भरपावसात

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील वावंढळ, विनेगाव, आसरे, जांभिवली, कांढरोली परिसरात विद्युत पुरवठा करणाऱ्या विद्युत वाहिन्या गर्द झाडीतून गेल्या आहेत. दरम्यान, विद्युत विभागाने पावसापूर्वीची कामे केली नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे वित्त हानीबरोबर जीवित हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, हा परिसर चार दिवस अंधारात आहे. पावसाळ्यात झाडाची फांदी तुटून विद्युत वाहीनीवर पडल्यावर वीज पुरवठा खंडीत होत आहे. त्यामुळे जीवित किंवा वित्तहानी टाळण्यासाठी विद्युत मंडळ पावसाळ्यापूर्वी झाडांच्या फांद्या तोडतात. मात्र, यावेळी पावसाळ्यापूर्वीची कामे भर पावसात केली जात आहेत. त्याचा त्रास येथील जनतेला होत आहे. गेल्या चार दिवसांपासून वीज पुरवठा खंडीत असल्यामुळे पाणी पुरवठा देखील बंद आहे. रुग्णांचे हाल होत असून, वयोवृद्ध व्यक्तींना त्रास होत आहे. या बाबतीत पत्रकार अर्जुन कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मेल द्वारे पत्र पाठवले आहे.





### निष्काळजीपणामुळे झाड कोसळले

**खांदा कॉलनी :** पनवेल प्रभाग क्रमांक १४ मधील प्रकाश मंगल कार्यालय रॉयल गार्डन परिसरात सुमारे २० वर्षांपासून जपलेले आंब्याचे झाड कोसळल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, काँक्रीट रस्त्याच्या कामादरम्यान ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे झाडाच्या मुळांना इजा झाल्याने हे झाड कोसळल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, हे झाड अनेक वर्षांपूर्वी लावण्यात आले होते. नियमित पाणी देऊन व काळजी घेऊन ते वाढविण्यात आले होते. त्यामुळे हे झाड केवळ वृक्ष नसून परिसरातील अनेकांच्या भावना आणि आठवणींशी जोडले गेले होते. झाड कोसळल्यानंतर ते पुन्हा उभे करण्याचे प्रयत्न करण्यात आले, मात्र यश आले नाही. या घटनेच्या पार्श्वभूमीवर विकासकामे करताना वृक्षांचे संरक्षण करणे अत्यावश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. तसेच, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी लवकरच ''वृक्ष संरक्षण व संवर्धन मोहिम'' सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाच्या फक्त वल्गनाच

- बायपास सुरू करण्याचे पुन्हा आश्वासन
- कोकणवासियांत संतापाची लाट



| माणगाव | सलीम शेख |

''यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी माणगाव बायपास सुरू होईल'', अशी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत केलेल्या या घोषणेनंतर कोकणवासीयांमध्ये आनंदापेक्षा तीव्र संताप, अविश्वास आणि नाराजीची लाट उसळली आहे. कारण गेली सतरा वर्षे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग आणि माणगाव-इंदापूर बायपासबाबत अशीच आश्वासने दिली जात आहेत. परंतु, प्रत्यक्षात मात्र प्रत्येक वर्षी कोकणवासीयांच्या वाट्याला केवळ अपूर्ण कामे, धुळीचे लोट, जीवघेणे खड्डे आणि अंतहीन वाहतूक कोंडी हेच आले आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू झाल्यापासून आजपर्यंत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुनील तटकरे, मंत्री भरत गोगावले यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी काम पूर्ण होण्याच्या तारखा जाहीर केल्या. ''यावर्षी'', ''या पावसाळ्यानंतर'', ''या गणेशोत्सवापूर्वी'' अशी अनेक आश्वासने देण्यात आली. परंतु, प्रत्येक वर्षी ही आश्वासने पावसाच्या पाण्यात वाहून गेली असून, महामार्गावरील खड्ड्यांमध्ये गाडली गेली, अशी संतप्त भावना कोकणवासीय व्यक्त करत आहेत. गणेशोत्सव हा कोकणवासीयांसाठी केवळ सण नसून भावनांचा उत्सव आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो चाकरमानी आपल्या मातीत परततात. मात्र, त्यांच्या स्वागताला तासन्तास वाहतूक कोंडी, उखडलेले रस्ते, खोल खड्डे आणि अपूर्ण बायपास असतो. अनेकदा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि रुग्णवाहिकांनाही या कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागतो. यंदाही माणगाव बायपास सुरू करण्याची घोषणा झाली असली, तरी माणगाव रेल्वे क्रॉसिंगवरील ओव्हरब्रिजचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. स्थानिकांच्या मते, हा पूल पूर्ण झाल्याशिवाय बायपास सुरळीतपणे सुरू होणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे सरकारच्या नव्या घोषणेकडे नागरिक ''आणखी एक फसवे आश्वासन'' म्हणूनच पाहत आहेत. त्यामुळे कोकणवासीयांचा संताप आता केवळ महामार्गापुरता मर्यादित राहिलेला नाही. १७ वर्षांच्या विलंबामुळे हजारो अपघात, शेकडो निष्पाप जीवांचा बळी, वाहनांचे आर्थिक नुकसान, वाढलेला प्रवासाचा वेळ आणि मानसिक त्रास सहन करावा लागल्याची भावना जनतेत आहे. विकासाच्या नावाखाली वारंवार आश्वासने दिली गेली; मात्र, प्रत्यक्षात विकासाची गती कासवापेक्षाही मंद राहिल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. त्यामुळे ''जर बायपास खरोखरच सुरू होणार असेल, तर ओव्हरब्रिज अपूर्ण असताना वाहतूक कशी सुरू करणार?'' असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे घोषणांवर विश्वास ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यावरच त्यावर विश्वास ठेवू, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

### यंदाही कोकणकरांचा प्रवास खड्ड्यांतूनच

मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणाच्या विकासाचा जीवनमार्ग मानला जातो. परंतु, गेल्या १७ वर्षांत तो विकासाचा नव्हे, तर विलंब, निष्काळजीपणा आणि अपूर्ण आश्वासनांचे प्रतीक बनला आहे. यंदाच्याही गणेशोत्सवात लाखो कोकणवासीयांना पुन्हा वाहतूक कोंडी, महामार्गावरील खड्डे आणि रखडलेल्या कामांच्या विळख्यातूनच प्रवास करावा लागणार, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे ''आता घोषणा नकोत, पूर्ण झालेला महामार्ग द्या; तारीख नको, प्रत्यक्ष बायपास सुरु करून दाखवा,'' अशी आर्त पण संतप्त हाक संपूर्ण कोकणातून उमटत आहे. आता जनतेचा संयम संपत चालला असून, प्रत्यक्ष कृतीचीच कोकणवासीयांना अपेक्षा आहे. अन्यथा, या फसव्या आश्वासनांची राजकीय किंमत भविष्यात संबंधित सरकार आणि लोकप्रतिनिधींना मोजावी लागू शकते, अशी तीव्र भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## महावितरणचा बेजबाबदारपणा बाहेर

### श्रीवर्धन-हरिहरेश्वर रस्त्यावर मृत्यूचा सापळा

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

''श्रीवर्धनमध्ये उच्चदाब लाईन कामात बेजबाबदारपणा; नियमांना तिलांजली, नागरिकांच्या जिवाशी खेळ!'' अशा स्पष्ट मथळ्याखाली काही दिवसांपूर्वी गंभीर समस्येवर सविस्तर वृत्त प्रसारित केले होते. कंत्राटदाराने नियम धाब्यावर बसवून अत्यंत कमी खोलीवर या हाय-व्होल्टेज अंडरग्राउंड (भूमिगत) केबल्स टाकल्याचे उघड झाले होते. मात्र, अनेक वृत्तपत्रांमध्ये वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही महावितरणच्या मुजोर प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे कानाडोळा केल्याचे धक्कादायक वास्तव आता पुन्हा समोर आले आहे.



प्रसारमाध्यमांनी या अंधाधुंद कारभारावर वारंवार कोरडे ओढल्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांचे डोळे उघडले नाहीत. बातम्या आल्यानंतर केवळ दाखवण्यापुरते, महावितरणने या उघड्या पडलेल्या वाहिनीवर वरचेवर खडी आणि माती टाकून काम दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता. मात्र, पहिल्याच मुसळधार पावसात ही माती आणि खडी वाहून गेली असून, महावितरणचे पाप पुन्हा एकदा रस्त्यावर उघडे पडले आहे. कंत्राटदार आणि प्रशासनाचा हा बेजबाबदारपणा प्रवाशांच्या जिवावर उठणारा ठरत आहे. सध्या कुरवडे येथील मुख्य रस्त्याची साईडपट्टी पूर्णपणे खचली असून, महावितरणची ही जीवघेणी अंडरग्राउंड केबल थेट रस्त्याच्या कडेला उघड्यावर पडली आहे. रात्रीच्या वेळी या मुख्य रस्त्यावरून प्रवास करताना समोरच्या वाहनाचा प्रखर प्रकाश डोळ्यांवर पडल्यास, चालकाने गाडी किंचित जरी बाजूला घेतली, तर थेट या हाय-व्होल्टेज वाहिनीवर गाडी जाऊन मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कुरवडे येथील या रस्त्याची आणि भूमिगत वाहिनीची दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. अन्यथा, येथे कोणताही अपघात झाल्यास त्याला सर्वस्वी महावितरण आणि संबंधित कंत्राटदार जबाबदार असेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## महावितरणच्या अभियंत्याची उर्मट वागणूक

| खोपोली | प्रतिनिधी |

विद्युत पुरवठा सुरळीत रहावा यासाठी सर्वजण महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेहमीच गाव पातळीवरील सहकार्य असते. मात्र, बीडखुर्द पंचकोशीतील ग्राहकांनी खालापूर शाखा अभियंता मनोज पाटील यांच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे. येथील विद्युत पुरवठा चार ते पाच दिवस खंडित झाला आहे. या काळात येथील जनतेने महावितरणचे शाखा अभियंता मनोज पाटील यांना विचारणा केली असता, मनोज पाटील यांच्याकडून नेहमीच उलट उत्तरे ग्राहकांना मिळाल्याने त्यांच्या कारभाराबाबत सर्वांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी सकारात्मक चर्चा केलीच नसून अरेरावीची भाषा केल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. ''तीन दिवस लाईट गेली तर त्यात काय झालं? अजून एक दिवस लाईट गेली तर तुम्हाला काय फरक पडणार आहे,'' असे संतापजनक वक्तव्य मनोज पाटील यांनी केले. तसेच, ''लाईट येणार नसेल तर आमची लाईट कायमच घालवा'', असे म्हटल्यावर, ''तुम्ही अर्ज करा, आम्ही तुमची कायमची लाईट बंद करू'' असे म्हणाल्याने त्यांचा मनमानी कारभाराचा प्रतापसमोर आला आहे.

## अतिवृष्टीत महापालिकेचे दावे फोल?

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका हद्दीत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन युद्धपातळीवर उपाययोजना राबवत असल्याचा दावा करत असले, तरी नवीन पनवेलमधील सेक्टर-१३ आणि आसपासच्या परिसरातील प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचे चित्र समोर आले आहे.

महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार प्रभागनिहाय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विविध भागांची पाहणी केली. प्रभाग समिती 'ड' अंतर्गत नवीन पनवेल येथील बांठिया शाळा, सेक्टर-१४ मधील पाणी साचणारी ठिकाणे तसेच होल्डिंग पाँड परिसराची उपायुक्त कैलास गावडे व उपायुक्त स्वरूप खरगे यांनी संयुक्त पाहणी केली. यावेळी पंप व्यवस्थापन,



जलनिचरा आणि सखल भागांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली. मात्र, अवघ्या तीन ते चार तासांच्या पावसात अभ्युदय बँकेपासून बांठिया शाळेसमोरील रस्ता, काळामाता मंदिर परिसरापर्यंत कंबरभर पाणी साचल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दरम्यान, रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा असल्याचे देखील निदर्शनास आले आहे.

## तळा शहरावर सीसीटीव्हीची नजर

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यातील वाढते शहरीकरण व रस्त्यांवरील गाड्यांची वाढती रहदारी यामुळे गुन्हेगारी तसेच अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. मात्र, शहरातील मुख्य रस्त्यावर अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असल्याने गुन्हेगारीला आळा बसला आहे.

तळा तालुक्यातून इंदापूर-आगरदांडा असा महामार्ग जात असून, पुढे तो दिघी पोर्टला जोडला जाणार आहे. त्यामुळे या मार्गावरून अवजड वाहनांची



वाहतूकीत वाढ होत आहे. तसेच, रोहा मार्गावर तहसील कार्यालय, पंचायत समिती, दुय्यम निबंधक कार्यालय, शासकीय विश्रामगृह, आयटीआय व तळा पोलीस ठाणे प्रस्तावित इमारत असल्याने, वाहतुकीमुळे कोंडी होण्याची शक्यता आहे. आसावरी नाका येथे कोणत्याही रस्त्याला दुभाजक नसल्याने कोणीही कसेही वळण घेत असल्याने, अपघात होऊ शकतात. याकरिता रहदारीचा उपाय म्हणून रोहा मार्गाच्या मध्यभागी चौक वजा पोल उभारून, एएनपीआर (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकॉगनिशन) असे अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे लोक वर्गणीतून लावण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक वाहन आपल्या डाव्या बाजूनेच जाईल व अपघात होणार नाहीत. तसेच, याठिकाणी लावण्यात आलेल्या कॅमेरांमुळे गुन्हेगारीला देखील आळा बसला आहे.

## हेल्प फाऊंडेशनला सुरक्षेची साथ

| खोपोली | प्रतिनिधी |

महामार्गावरील भीषण अपघात असो, पूरपरिस्थिती, दरडी कोसळणे, धबधब्यात अडकलेले पर्यटक, वन्यजीव बचाव किंवा कोणतेही नैसर्गिक संकट शासकीय यंत्रणांसोबत खांद्याला खांदा लावून कोणत्याही अपेक्षेशिवाय जीव धोक्यात घालून मदतकार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना सक्षम करणे ही काळाची गरज आहे. याच सामाजिक जाणीवेतून मंत्री आदिती तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांनी हेल्प फाऊंडेशनच्या आपत्कालीन बचाव कार्यासाठी आवश्यक असलेली सुरक्षा संसाधने व साहित्य उपलब्ध करून देत संस्थेच्या कार्याला मोलाची साथ दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी किशन जावळे आणि पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून अत्याधुनिक संसाधने उपलब्ध करण्यासाठी हे दोघेही सातत्याने प्रयत्नशील आहेत. कर्जत येथे आयोजित कार्यक्रमात ही सुरक्षा संसाधने हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर आणि निलेश कुदळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

## तिसऱ्या मजल्यावर अडकलेल्याची सुटका

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पाली शहरात बुधवारी (दि.८) मध्यरात्री एक थरारक आणि जीवघेणी घटना घडली. श्री बल्लाळेश्वर मंदिर परिसरातील विठू माऊली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या बाहेरील सज्ज्यावर एक व्यक्ती चढून बसला होता. मात्र, खाली उतरण्याचा मार्ग नसल्याने तो त्या ठिकाणी अडकून पडला. ही बाब स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ पाली पोलीस ठाण्याशी संपर्क साधून



घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पाली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने सरकारी वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेतला. संबंधित व्यक्ती तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या सज्जयावर बसलेला असल्याने त्याचा जीव धोक्यात होता. कोणत्याही क्षणी तो खाली कोसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. पोलीस वाहनात आपत्कालीन परिस्थितीसाठी उपलब्ध असलेल्या दोरखंडांचा वापर करण्यात आला. तसेच, स्थानिक नागरिकांची मदत घेत इमारतीच्या टेरेसवरून दोरखंड खाली सोडण्यात आला. अत्यंत सावधगिरी बाळगत आणि शिताफीने पोलिसांनी संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचून त्याला सुरक्षितरीत्या वर खेचले. काही वेळ चाललेल्या या बचाव मोहिमेनंतर त्याची सुखरूप सुटका करण्यात आली. या धाडसी आणि तत्पर कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला.

**डिकसळ-पालीतील ग्रामस्थ समस्यांच्या विळख्यात | आपत्तीग्रस्त नागरिकांमधून नाराजी व्यक्त**

# दरडीच्या सावटाखाली शाळेचा आसरा

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील डिकसळ-पाली येथील आदिवासी बांधव आणि ग्रामस्थ सध्या अत्यंत बिकट व गंभीर समस्यांच्या विळख्यात सापडले आहेत. मुसळधार पावसामुळे गावात दरड कोसळण्याची तीव्र भीती निर्माण झाली असून, गेल्या तीन दिवसांपासून संपूर्ण गाव अंधारात चाचपडत आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने सुमारे ७ ते ८ कुटुंबांना रात्रीच्या वेळी पाली येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्थलांतरित होण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, या तात्पुरत्या छावणीत ना पिण्याचे पाणी, ना जेवणाची सोय, अशी दुरवस्था असल्याने आपत्तीग्रस्त



नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, घरांवर कधीही दरड कोसळून झोपेतच काळ घाला घालेल, या भीतीने गेल्या ५-६ दिवसांपासून येथील ग्रामस्थ प्रचंड मानसिक दडपणाखाली आहेत. रात्री २ वाजताच्या सुमारास जेव्हा भीती वाढते, तेव्हा स्थानिक नागरिक रस्त्यावरील साचलेल्या घाण व चिखलाच्या पाण्यातून वाट काढत कसेबसे या जिल्हा परिषद शाळेत धावत येतात. परंतु, तिथे आल्यावरही त्यांची कोणतीही दखल घेणारे तिथे हजर नसते, असा गंभीर आरोप येथील महिलांनी केला आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासकीय ढिसाळ कारभाराचा पाढा वाचताना अत्यंत गंभीर बाबी समोर आणल्या आहेत. जिल्हा परिषद शाळेचे छत पूर्णपणे गळत असून, संपूर्ण वर्गांमध्ये चिखल आणि पाणी साचले आहे. त्यामुळे नागरिकांना तिथे साधे बसायला किंवा झोपायलाही कोरडी जागा उपलब्ध नाही. तसेच, गेल्या तीन दिवसांपासून वीज पुरवठा खंडित असल्याने आधीच गाव अंधारात आहे, त्यात शाळेतही लाईटची कोणतीही व्यवस्था नाही. मोबाईलची चार्जिंग संपल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत कोणाशी संपर्क साधणेही कठीण झाले आहे. गर्दीच्या ठिकाणी लहान मुले घाबरून रात्रभर रडत असतात. त्यांना या ओलसर, दमट आणि अंधाऱ्या जागेत ठेवल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या संवेदनशील परिस्थितीमुळे स्थानिक प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापनाचे पुरते वाभाडे निघाले आहेत. केवळ कागदावर आणि तोंडी आदेश देऊन नागरिकांना स्थलांतरित करायचे आणि त्यांच्या मूलभूत गरजांकडे पाठ फिरवायची, या कारभारामुळे प्रशासनाबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोणतीही मोठी जीवितहानी होण्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात तात्काल लक्ष घालून डिकसळ पालीतील नागरिकांची योग्य व सुरक्षित ठिकाणी व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## पावसाच्या प्रवाहाने रस्ता गेला वाहून

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील माडप मुठा ठाकूरवाडी येथे मुसळधार पावसामुळे डोंगराला मोठ्या प्रमाणात भेगा पडून काही ठिकाणी भूस्खलन झाल्याचे समोर आले आहे. याचदरम्यान, गावाकडे जाणारा मुख्य रस्ता वाहून गेल्याने येथील नागरिकांचा संपर्क धोक्यात आला असून दैनंदिन प्रवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नुकतेच ठाकूर समाजातील ग्रामस्थांनी माडप येथे आंदोलन छेडले होते.काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने सावरोली-खारपाडा मार्गही रोखून धरण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाच्या मध्यस्थीने रस्त्याचे काम लवकर सुरू करून पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच झालेल्या मुसळधार पावसाने रस्त्याची अक्षरशः दाणादाण उडवली. सुमारे दोन ते तीन किलोमीटरचा डोंगरदऱ्यातून जाणारा हा मार्ग अनेक वर्षांपासून ग्रामस्थांच्या दैनंदिन जिवनात वापरात आहे. रस्ता खचल्यामुळे आता या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे. डोंगराला पडलेल्या भेगा आणि भूस्खलनामुळे भविष्यात आणखी मोठा धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)